दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
-संपादक



## थोडक्यात...

### मराठी सक्तीची; १८ पासून कारवाई

पुणे : राज्यातील ऑटो–रिक्षा आणि इलेक्ट्रॉनिक मीटर असलेल्या टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी १५ ऑगस्ट ही अंतिम मुदत देण्यात आली होती. ही मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवली जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील प्रस्तावित सुधारणांनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांशी योग्य संवाद साधता यावा, त्यांचे म्हणणे समजून घेता यावे आणि त्यांचा प्रवास सुरक्षित व सोयीस्कर व्हावा, यासाठी चालकांना स्थानिक(मराठी) भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. चालकांना १७ तारखेपर्यंत वेळ देण्यात आला असून १८ तारखेपासून कारवाईला सुरुवात केली जाईल असा इशारा त्यांनी दिला आहे. वाहनांना हाय–सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याच्या निर्णयाबाबतही सरनाईक यांनी महत्त्वाची माहिती दिली.

### भारताची सहिष्णुता म्हणजे कमजोरी नव्हे–डोवाल

दिल्ली: राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी म्हटले आहे की, भारताची उदारता आणि सहिष्णुता याला कमजोरी समजण्याची चूक करू नये. पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंधित दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणे हे ऑपरेशन सिंदूरचे मुख्य उद्दिष्ट होते. परिणामांची पर्वा न करता धोका पत्करण्याची आणि जोरदार प्रहार करण्याची क्षमता देशात आहे. डिस्कव्हरीच्या आगामी माहितीपट मालिका, डीक्लासिफाइड: ऑपरेशन सिंदूरसाठी दिलेल्या मुलाखतीत डोवाल म्हणाले की, या ८८ तासांच्या लष्करी कारवाईचा उद्देश शत्रूचे दहशतवादी तळ, विशेषतः पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेले तळ नष्ट करणे हा होता. हे आम्ही या कारवाईचे उद्दिष्ट ठेवले होते. जगाला संदेश स्पष्ट आहे: भारताची उदारता किंवा सहिष्णुता सर्वोच्च आहे. परिणामांची पर्वा न करता भारत जोखीम घेऊ शकतो आणि जोरदार प्रहारही करू शकतो.

### पुण्यातील कँप शाखेचा परवाना जागेवरच रद्द!

मुंबई : राज्यभर धडाकेबाज कारवाई करणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्या एफडीएने आता पुण्यामध्ये मोठी कारवाई केली आहे. पुण्यातील कँप परिसरातील बर्गर किंगमध्ये अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आढळून आल्यामुळे त्याचा परवाना रद्द करण्यात आला आहे. दररोज हजारो खवय्यांची तुफान गर्दी होणाऱ्या या आऊटलेटवर थेट परवाना रद्द करण्याची कारवाई झाल्याने पुणेकर खवय्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. मुंबईत डॉमिनोज पिझ्झावर धडक कारवाई केल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने आता आपला मोर्चा पुण्यातील प्रसिद्ध फूड जॉईंट्सकडे वळवला आहे. पुण्यातील कँप परिसरात असलेल्या अत्यंत सुप्रसिद्ध बर्गर किंगवर एफडीएने अचानक छापेमारी करत शाखेचा अन्न परवाना जागेवरच रद्द केला आहे.

### सुटीची सूचना

आज दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिन असल्यामुळे दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.
– व्यवस्थापक

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१४ ऑगस्ट २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७४.५० क्विंटल | २,५९० | २,८०० | २,६५३ |
| ज्वारी/हायब्रिड : ८३.०० क्विंटल | २,००० | ४,२८० | २,८९० |
| मका/लोकल: ५.०० क्विंटल | २,४५३ | २,४५३ | २,४५३ |
| तूर : २.५० क्विंटल | ६,७५० | ७,००० | ६,८७५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९३.०० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,६२० |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: १२.५० क्विंटल | ५,१०० | ६,००१ | ५,४९४ |

# दोन ते चार दिवसांत कर्जमाफीची रक्कम खात्यावर-कृषीमंत्री

वाशिम । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी असून, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'अंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात येत्या दोन ते चार दिवसांत सुमारे ५ ते १० हजार कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा होणार आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे ही माहिती दिली.**



या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जात आहे. सध्या कर्जमाफीच्या याद्यांची 'ॲग्रीस्टॅक' प्रणालीद्वारे पडताळणी सुरू आहे. याद्या अद्ययावत होताच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे. यासाठी शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याचेही मंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. या योजनेतून राज्यातील शेतकऱ्यांना एकूण ४० हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. शहरी भागातील शेतकऱ्यांना सिंचन विहीर तसेच अन्य कृषी योजनांचा लाभ मिळत नसल्याचा मुद्दा पत्रकारांनी उपस्थित केला. याबाबत आपल्याला पूर्वकल्पना नसल्याचे भरणे यांनी सांगितले. मात्र, भविष्यात शहरी भागातील शेतकऱ्यांनाही शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळावा, यासाठी योग्य ती तरतूद केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. दरम्यान, सातबारा उतारा किंवा अन्य अधिकार अभिलेखांवर नावे नोंद नसलेल्या राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांना अधिकृत महसूल रेकॉर्डवर आणण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये संतापजनक प्रकार: स्व.विलास घुले यांच्या पत्नीकडून उपोषणस्थळी विष प्राशन

बीड । प्रतिनिधी

टाकळी तालुका केज येथील व्यावसायिक विलास घुले याची मागील काही महिन्यापूर्वी कट रचून हत्या झाली होती. या गटातील सर्व आरोपींना अटक करण्यात यावी या मागणीसाठी घुले कुटुंबीय जिल्हाधिकारी कार्यालय समोर गेल्या दहा दिवसापासून उपोषणाला बसले आहे. उपोषणाची शासन आणि प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने, शुक्रवारी जिल्ह्यात पालकमंत्री असताना



उपोषण स्थळीच स्व.विलास घुलेच्या पत्नीने विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ▶▶ पान २ वर

### जगून तरी मी काय करू...

स्थानिक वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना स्वर्गीय विलास घुले यांच्या पत्नी सुष्मा घुले यांनी थेट विषारी औषध प्राशन करून आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. विष प्राशन करण्यापूर्वी त्यांनी ''आता माझा तरी जगून काय उपयोग'' अशी हवालदिल प्रतिक्रिया दिली, ज्यामुळे उपोषणस्थळावर एकच खळबळ उडाली.

### महिला पोलिसांमुळे जीव वाचला

दरम्यान, एक स्थानिक प्रतिनिधी स्वर्गीय विलास घुले यांचे बंधू रमेश घुले यांची प्रतिक्रिया घेत असताना, त्यांनी लगेच मयताच्या पत्नीची प्रतिक्रिया विचारली त्याचवेळी हा प्रकार घडला. मात्र बाजूला असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी ताबडतोब झडप मारून ती विषारी औषधाची बाटली हिसकावण्याचा प्रयत्न केला. महिला पोलिसांनी तत्परता दाखवल्यामुळे पुढील अनर्थ टळला.



## राष्ट्रवादी फक्त शरद पवारांचीच–सुप्रिया सुळे

पुणे । प्रतिनिधी

सध्या शिवसेना पक्ष आणि चिन्ह याबाबत सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु आहे. सुनावणीत दोन्ही बाजूंकडून युक्तिवाद केला जात असून, उबाठा गटाचे वकिल कपिल सिब्बल जोरदार व्यक्तिवाद करत आहेत. ते अनेक मुद्यांवर कोर्टाचे लक्ष वेधून घेत आहेत. सिब्बल यांनी निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालावर आक्षेप नोंदवला आहे. याचदरम्यान शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठे वक्तव्य केले आहे.

''मी राष्ट्रवादी पक्ष हा फक्त शरद पवार यांच्यासाठी मागतेय. शरद पवार ▶▶ पान २ वर

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील ८२ जवानांना शौर्य व सेवा पदके जाहीर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देशातील पोलीस, अग्निशमन, नागरी संरक्षण व होमगार्ड तसेच सुधारात्मक सेवांमध्ये उल्लेखनीय कार्य बजावणाऱ्या एकूण १,०५७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ८२ अधिकारी



व कर्मचाऱ्यांचा समावेश असून, विविध क्षेत्रांत बजावलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. कर्तव्य बजावताना जीवित व मालमत्तेचे रक्षण करणे, गुन्हे रोखणे अथवा ▶▶ पान २ वर

## जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जात सांगावी लागणार

### सरकारकडून प्रश्नांची यादी जाहीर

पुणे । प्रतिनिधी

देशातील आगामी जनगणनेच्या तयारीला वेग आला असून, केंद्र सरकारने जनगणनेदरम्यान नागरिकांना विचारण्यात येणाऱ्या ४० प्रश्नांची यादी जाहीर केली आहे. यावेळच्या जनगणनेत पहिल्यांदाच जात संबंधित माहिती नोंदवली जाणार आहे. याशिवाय कुटुंब, शिक्षण, रोजगार, स्थलांतर आणि



डिजिटल साक्षरतेसह काही वैयक्तिक माहितीही घेतली जाणार आहे. या जनगणनेतील सर्वात ▶▶ पान २ वर

## मनोज जरांगे मानसिकदृष्ट्या विकृत, त्यांच्यावर योग्य संस्कार नाहीत - आ. विजय रहांगडाले



वाशिम । प्रतिनिधी

कुणबी प्रमाणपत्र रद्द केल्याच्या मुद्यावरुन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आक्रमक झाले आहेत. त्यांनी नुकताच पश्चिम महाराष्ट्राचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी सरकारवर जोरदार टीका केल्याचे पाहायला मिळाले. विशेषतः राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जरांगेंनी जोरदार हल्लाबोल चढवला. तसेच त्यांच्यावर व्यंगात्मक टीका देखील केली. त्यांच्या या टीकेनंतर भाजप आक्रमक झाली आहे. मनोज जरांगे हे मानसिकदृष्ट्या विकृत आहेत, त्यांच्यावर योग्य संस्कार झालेले नाहीत, असे म्हणत भाजप आ.विजय रहांगडाले यांनी जरांगेंवर टीका केली.

मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर केलेल्या टीकेनंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. बावनकुळेंवरील या टीकेला भाजपचे आमदार विजय ▶▶ पान २ वर

## महाराष्ट्राची ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या दिशेने वाटचाल!

### स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



मुंबई । प्रतिनिधी

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईतील ताज हॉटेल येथे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित राजनैतिक अधिकारी, वाणिज्यदूत, विविध देशांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांचे स्वागत केले.भारताची प्रगती, महाराष्ट्राची आर्थिक ताकद आणि भविष्यातील विकासदृष्टी यांचा यावेळी त्यांनी आढावा घेतला.

मुख्यमंत्री यांच्या पत्नी अमृता फडणवीस, ▶▶ पान २ वर

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड इमारतीचा
कोनशिला समारंभ व भूमिपूजन सोहळा
• शुभहस्ते •
मा. ना. श्रीमती सुनेत्रा अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ) महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, बीड
• प्रमुख उपस्थिती •
मा. ना. पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे
मा. मंत्री (पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल) महाराष्ट्र राज्य तथा प्रतिकुलपती, मपमविवि, नागपूर
मा. श्री. बजरंग मनोहर सोनवणे – लोकसभा सदस्य
मा. श्री. बसवराज माधवराव पाटील – विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके – विधानसभा सदस्य
मा. श्री. संदीप रविंद्र क्षीरसागर – विधानसभा सदस्य
मा. श्री. राजकुमार सुदाम बडोले – विधानसभा सदस्य तथा कार्यकारी परिषद सदस्य, मयमविवि, नागपूर
मा. श्री. धनंजय पंडितराव मुंडे – विधानसभा सदस्य
मा. डॉ. परिणय रमेश फुके – विधानपरिषद सदस्य तथा कार्य. परिषद सदस्य, मपमविवि, नागपूर
मा. श्री. सुरेश रामचंद्र धस – विधानसभा सदस्य
मा. श्री. विजयसिंह शिवाजीराव पंडीत – विधानसभा सदस्य
मा. श्री. संजय नारायणराव मेश्राम – विधानसमा सदस्य तथा कार्यकारी परिषद सदस्य, मपमविवि, नागपूर
मा. श्री. सतीश भानुदासराव चव्हाण – विधानपरिषद सदस्य
मा. श्री. विक्रम वसंतराव काळे – विधानपरिषद सदस्य
मा. श्रीमती नमिता अक्षय मुंदडा – विधानसभा सदस्य
मा. श्री. चैनसुख मदनलाल संचेती – विधानसभा सदस्य तथा कार्यकारी परिषद सदस्य, मपमविवि, नागपूर
मा. सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी – नगराध्यक्षा, परळी वैजनाथ
• विशेष उपस्थिती •
मा. डॉ. नितीन पाटील – कुलगुरू, मपमविवि, नागपूर
मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) – आयुक्त पशुसंवर्धन
मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) – सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य
मा. श्री. विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) – जिल्हाधिकारी, बीड
मा. श्री. जी. श्रीकांत (भा.प्र.से.) – विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
मा. इंजि. गोविंद बापुराव नरवटे – कार्यकारी परिषद सदस्य, मपमविवि, नागपूर
शनिवार दि. 15 ऑगस्ट, 2026 रोजी दुपारी 2.00 वाजता
स्थळ : ग्रामीण पोलीस स्टेशन परळीच्या बाजुला, नंदागौळ रोड, परळी वैजनाथ जि. बीड
या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहावे ही विनंती.
• विनीत •
डॉ. शिरीष उपाध्ये – संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान शाखा), मपमविवि, नागपूर
श्री. प्रमोदकुमार तायडे – विद्यापीठ अभियंता, मपमविवि, नागपूर
डॉ. प्राणेश येवतीकर – प्रकल्प अधिकारी, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड

## अग्रलेख

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याची सरकारी व्याख्या

लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य असते, असे आपण संविधानाच्या पुस्तकात वाचतो. प्रत्यक्षात मात्र त्याची नवी व्याख्या तयार होताना दिसते''तुम्हाला बोलण्याचा पूर्ण अधिकार आहे; फक्त तुम्ही काय बोलता, कुणाविरुद्ध बोलता आणि किती मोठ्याने बोलता, हे आम्ही ठरवू!'' अर्थात ही व्याख्या संविधानाने केलेली नाही; सत्तेच्या सोयीने तयार झालेली आहे. आणि म्हणूनच राहुल गांधी यांनी आरएसएसच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहण्याची घोषणा केली, तेव्हा त्याकडे केवळ राजकीय विधान म्हणून पाहणे म्हणजे मुद्दाम डोळे बंद करून आरशाला दोष देण्यासारखे आहे.

आरएसएसच्या विचारसरणीशी राहुल गांधींचे तीव्र मतभेद आहेत. हे नवे नाही. पण ''ज्या दिवशी आरएसएसची अभिव्यक्ती दडपण्याचा प्रयत्न केला जाईल, त्या दिवशी मी त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करेन,'' या भूमिकेने एक मूलभूत लोकशाही प्रश्न समोर आणला आहे. विरोधकाचा विचार चुकीचा वाटतो म्हणून त्याचा आवाज बंद करण्याचा अधिकार कुणालाच नाही. कारण लोकशाहीचे सौंदर्य हे आपल्या समर्थकांना माईक देण्यात नाही; आपल्या विरोधकाला माईक हातात असतानाही सहन करण्यात आहे. आपल्याकडे मात्र एक विलक्षण राजकीय संस्कृती विकसित झाली आहे. आपल्या बाजूचा माणूस बोलला तर ''अभिव्यक्ती स्वातंत्र्य''; विरोधक बोलला तर ''देशविरोधी अजेंडा''. आपला नेता आंदोलन करतो तेव्हा ''लोकशाहीचा लढा''; विरोधक आंदोलन करतो तेव्हा ''कायदा-सुव्यवस्थेला धोका''. आपल्या समर्थकाने सरकारवर टीका केली तर ''जागरूक नागरिक''; दुसऱ्याने केली तर ''राष्ट्रविरोधी शक्तींच्या हातातील बाहुले''. म्हणजे संविधान एकच, पण त्याचे अर्थ पक्षानुसार बदलणारे. काय अप्रतिम लोकशाही! राहुल गांधींनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा संदर्भ देत सरकारवर प्रश्न उपस्थित केला आहे. विद्यार्थ्यांना बोलायचे आहे, त्यांच्या अडचणी मांडायच्या आहेत, पण त्यांचा आवाज ऐकण्याऐवजी प्रशासनिक निर्बंध आणि पोलिसी कारवाईचा आधार घेतला जात असल्याचा त्यांचा आरोप आहे. सरकारकडे यावर आपले स्पष्टीकरण आहे. कायदा-सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी आहे, असे सरकार म्हणू शकते. आणि ते बरोबरही आहे. पण प्रश्न एवढाच आहेकायदा-सुव्यवस्था राखताना नागरिकाचा आवाजही सुरक्षित ठेवता येतो का? की आपल्या प्रशासनाला आता नागरिक दोन प्रकारचेच हवेतपहिला प्रकार म्हणजे सरकारचे कौतुक करणारा आणि दुसरा म्हणजे शांत बसणारा? जंतरमंतरवर विद्यार्थी प्रश्न विचारतात, आंदोलन करतात, सरकारकडे उत्तर मागतात. लोकशाहीत याला आंदोलन म्हणतात. व्यवस्थेला मात्र अनेकदा हे ''अडथळा'' वाटते. आणि मग प्रशासनाचे नेहमीचे शस्त्र बाहेर येतेपरवानगी, निर्बंध, पोलिस बंदोबस्त, बॅरिकेड्स आणि शेवटी ''कायदा-सुव्यवस्था''. नागरिकांच्या प्रश्नांपेक्षा बॅरिकेड्स अधिक मजबूत असतील, तर सरकारला स्वतःच्या प्रशासनिक यशाचा आनंद घेता येईल; पण लोकशाहीचा प्रश्न सुटणार नाही. याहून गंभीर बाब म्हणजे माध्यमांचे स्वातंत्र्य. च्या २०२६ मध्ये भारत १८० देशांमध्ये १५७व्या क्रमांकावर आहे. २०२५ मध्ये भारत १५१व्या क्रमांकावर होता. म्हणजे सुधारण्याऐवजी क्रमवारी आणखी घसरली. अर्थात सरकार या आंतरराष्ट्रीय निर्देशांकांशी असहमत असू शकते. त्यावर प्रश्नही उपस्थित केले जाऊ शकतात. पण एखाद्या अहवालावर नाराजी व्यक्त केली म्हणून त्यातील प्रश्न गायब होत नाहीत. थर्मामीटरवर रागावून ताप कमी होत नाही. च्या २०२६ च्या अहवालात भारताला १०० पैकी ६२ गुण देऊन '' '' म्हणजे ''अंशतः मुक्त'' अशी श्रेणी देण्यात आली आहे. या अहवालातील प्रत्येक निष्कर्ष अंतिम सत्य आहे, असे मानण्याचे कारण नाही. पण देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पत्रकारिता आणि नागरी स्वातंत्र्याबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर सत्तेने त्यांना फक्त ''भारतविरोधी अहवाल'' म्हणून फेटाळण्याऐवजी त्यातील मुद्द्यांना उत्तर देणे अधिक लोकशाहीवादी ठरेल. कारण संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे; सरकारने परवानगी देऊन ते दिलेले नाही. भारतीय संविधानाच्या कलम १९ अंतर्गत भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यावर कायदेशीर आणि वाजवी निर्बंध आहेत, हेही तितकेच खरे. पण ''वाजवी निर्बंध'' आणि ''सोयीचे निर्बंध'' यातला फरक कोण ठरवणार? सत्ता जर स्वतःच ठरवणार असेल, तर नागरिकाने प्रश्न विचारायचा कुणाला? आणि इथेच राहुल गांधींच्या विधानाची खरी परीक्षा आहे. आरएसएसचा आवाज दाबला जाऊ नये, असे राहुल गांधी म्हणतात. ठीक आहे. मग उद्या काँग्रेसचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, तर आरएसएसनेही त्याच तत्त्वासाठी उभे राहायला हवे. सरकारवर टीका करणाऱ्या पत्रकाराचा आवाज दाबला गेला तर पत्रकाराच्या विचारांशी असहमती असलेल्या सत्ताधाऱ्यांनीही त्याच्या अधिकाराचे संरक्षण केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मागण्या चुकीच्या वाटल्या तरी त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार असला पाहिजे. लोकशाही म्हणजे ''माझे बोलणे स्वातंत्र्य आणि तुझे बोलणे कटकारस्थान'' नव्हे. दुर्दैवाने आपल्या राजकारणाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यालाही पक्षीय गणित शिकवले आहे. सत्ता बदलली की घोषवाक्ये बदलतात; पण सत्तेची प्रवृत्ती अनेकदा तीच राहते. विरोधात असताना प्रत्येक पक्ष अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मोठा पुरस्कर्ता असतो. सत्तेत गेल्यावर त्याला कायदा-सुव्यवस्था आठवते. आणि हे चक्र इतक्या सातत्याने चालते की नागरिकाला आता प्रश्न पडावासत्तेत गेल्यावर संविधानाची अक्षरे लहान होतात की सत्तेची खुर्ची मोठी होते? सरकारविरोधी बोलणे म्हणजे देशविरोधी बोलणे नाही. पंतप्रधान म्हणजे देश नाहीत. गृहमंत्री म्हणजे संविधान नाहीत. सत्ताधारी पक्ष म्हणजे राष्ट्र नाही. आणि सरकारवर टीका करणारा प्रत्येक नागरिक शत्रू नाही. हे सांगण्याची वेळ लोकशाहीच्या सर्वात मोठ्या दावेदार देशात पुन्हा पुन्हा यावी, हीच खरी विडंबना आहे. त्याचवेळी विरोधकांनाही एक प्रश्न आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा झेंडा फक्त सरकारविरोधात असताना उचलायचा आणि आपल्या पक्षावर प्रश्न विचारले की त्याच नागरिकाला शत्रू मानायचे, असे चालणार नाही. लोकशाहीचे स्वातंत्र्य सार्वत्रिक असते; ते निवडक नसते. आज राहुल गांधी आरएसएसच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणाची भाषा करत आहेत. उद्या भाजपने काँग्रेसच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहिले, तर भारतीय लोकशाही आणखी मजबूत होईल. परवा काँग्रेसने भाजपच्या एखाद्या टीकाकाराच्या अधिकाराचे संरक्षण केले, तरी तेही लोकशाहीचेच यश असेल. कारण शेवटी प्रश्न कोण बोलतोय हा नाही. प्रश्न असा आहेत्याला बोलू दिले जातेय का? लोकशाहीत सरकारची ताकद किती आहे, यापेक्षा नागरिकाचा आवाज किती सुरक्षित आहे हे महत्त्वाचे. निवडणुका पाच वर्षांनी होतात; पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याची परीक्षा रोज होते. संसदेत विरोधक प्रश्न विचारतो तेव्हा. पत्रकार सरकारला अस्वस्थ करणारा प्रश्न विचारतो तेव्हा. विद्यार्थी रस्त्यावर उतरतो तेव्हा. आणि सामान्य नागरिक सत्तेला म्हणतो तेव्हा''तुम्ही चुकत असाल तर?'' त्या प्रश्नावर सरकारचे उत्तर काय आहे, यावर लोकशाहीचे आरोग्य ठरते. म्हणून आजचा प्रश्न राहुल गांधींच्या विधानापेक्षा मोठा आहेया शासनकाळात अभिव्यक्ती स्वातंत्र्य उरले आहे का? उत्तर ''नाही'' असे देणे सोपे आहे. ''होय'' असे देणेही सोपे आहे. पण खरे उत्तर मधोमध अस्वस्थ करणारे आहेअधिकार संविधानात अजूनही आहे; प्रश्न आहे तो अधिकार वापरण्याची भीती कमी झाली आहे की वाढली आहे? आणि म्हणूनच सत्तेला एक छोटासा सल्लानागरिक बोलत असेल तर प्रत्येक आवाजात कटकारस्थान शोधण्यापेक्षा त्यातला प्रश्न शोधा. पत्रकार प्रश्न विचारत असेल तर त्याला शत्रू समजण्यापेक्षा उत्तर द्या. विद्यार्थी आंदोलन करत असतील तर त्यांच्यावर बॅरिकेड उभे करण्यापूर्वी त्यांच्या प्रश्नांभोवती उत्तरांची भिंत उभी करा. कारण बॅरिकेड्स रस्ते बंद करू शकतात; प्रश्न नाही. पोलिसांचा बंदोबस्त आंदोलन थांबवू शकतो; असंतोष नाही. माईक बंद करता येतो; नागरिकाच्या मनातील प्रश्न बंद करता येत नाही. आणि शेवटी, लोकशाहीची खरी ओळख ही नाही की सरकारला किती लोक समर्थन देतात. खरी ओळख ही आहेसरकारला न आवडणारे किती लोक निर्भयपणे बोलू शकतात. जर आरएसएसला बोलता येत असेल, काँग्रेसला बोलता येत असेल, भाजपवर टीका करता येत असेल, सरकारला प्रश्न विचारता येत असेल, विद्यार्थ्यांना आंदोलन करता येत असेल आणि पत्रकारांना सत्ता अस्वस्थ करणारे प्रश्न विचारता येत असतीलतर लोकशाही जिवंत आहे. पण जर प्रत्येक प्रश्नाला आधी पक्षाचा रंग पाहावा लागत असेल, प्रत्येक आंदोलनाला आधी पोलिसांची परवानगी शोधावी लागत असेल आणि प्रत्येक टीकेला आधी देशभक्तीचे प्रमाणपत्र घ्यावे लागत असेल तर मग लोकशाही उरते कुठे? लोकशाहीला सर्वात मोठा धोका विरोधकांकडून नसतो. तो धोका तेव्हा निर्माण होतो, जेव्हा सत्तेला प्रश्न विचारणारा नागरिक त्रासदायक वाटू लागतो.




## नवीन वृद्ध कलावंताच्या अनुदान सुरू करण्यासाठी उपोषण

जालना । प्रतिनिधी

**खरे वृद्ध कलावंत यांचं अनुदान चालू करण्यासाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले. या संदर्भात उपोषण करते म्हणाले की खोटे वृद्ध कलावंत यांना अनुदान सुरू असून खरे वृद्ध कलावंत वंचित असल्याचे ते म्हणाले महाराष्ट्र सरकारने तत्काळ निर्णय घेऊन वृद्ध कलावंत यांचे अनुदान मंजूर करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.**

वंचित वृद्ध कलावंत १४/०८/२०२६ पासून परिषद कार्यालय जालना येथे आमरण उपोषणास बसले आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे जाग्यावरच भजन कीर्तन सुरू केले. याबाबत वृद्ध कलावंताच्या मागण्या वृद्ध कलावंताच्या मानधनात वाढ करून ११०००/- रुपये मासिक मानधन देण्यात यावे. वृद्ध कलावंताचा जिल्हास्तरीय मानधन मंजुरी इस्टांक १०० वरून २०० करण्यात यावा. मानधन निवड समिती स्थापन करून मानधन प्रस्ताव निकाली काढण्यात यावे. मूळ कागदपत्रे तपासूनच अंतिम यादी तयार करण्यात यावी जेणेकरून पात्र वृद्ध कलावंतांना न्याय मिळेल. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# ऐतिहासिक झेप: पंकजाताईंच्या दूरदृष्टीतून परळीत साकारतेय पशुसंवर्धनाचे 'पॉवर सेंटर'!

परळी । प्रतिनिधी

परळीच्या विकासात्मक जडणघडणीच्या इतिहासात आणखी एक मोठे पान लिहिले जात आहे. ज्योतिर्लिंग वैद्यनाथाची धार्मिक नगरी, ऊर्जा नगरी अशी ओळख असलेल्या परळीला आता पशुवैद्यकीय शिक्षण, संशोधन, उपचार आणि आधुनिक पशुसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून नवी ओळख मिळणार आहे. परळीची लेक राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून परळी येथे भव्य पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय संकुल उभारणीच्या दिशेने आज पायाभरणीचे निर्णायक पाऊल पडत आहे. हा एक इतिहास ठरणार आहे. हा केवळ एक कॉलेज प्रकल्प नाही; तर शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी आणि संपूर्ण पशुसंवर्धन क्षेत्राच्या भविष्यात बदल घडविणारी मोठी पायाभूत गुंतवणूक ठरणार आहे.५६४ कोटींच्या या प्रकल्पाची भूमिपूजनाची ही कोनशिला परळीच्या विकासातील नवी झेप ठरणार आहे.

परळीची लेक राज्याची पशुसंवर्धन मंत्री झाल्याबरोबर एक मोठं आणि पिढ्यान् पिढ्या लक्षात राहील असं गिफ्ट परळीकरांना मिळालं. राज्य मंत्रिमंडळाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी परळीत नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली. या प्रकल्पासाठी सुमारे ५६४.५८ कोटींच्या खर्चास मान्यता देण्यात आली.पंकजाताई मुंडे यांनी पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर परळीला आणि बारामतीला हे महत्त्वाचे संस्थात्मक केंद्र मिळाले. आपल्या परळीला मोठे प्रकल्प आणण्याची राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासनाला त्यासाठी कामाला लावण्याची क्षमता या दोन्हींचा परिणाम म्हणून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली गेली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ मधील ८ हेक्टर ८० आर व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर आणि अतिरिक्त १३ हेक्टर अशी एकूण ४१ हेक्टर ८० आर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात आली आहे. परळीतील जमीन महाविद्यालयीन संकुलासाठी, तर लोणी येथील जमीन पशुधन प्रक्षेत्रासाठी वापरण्याचे नियोजन आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांना केवळ चार भिंतींच्या वर्गात पशुवैद्यकीय शिक्षण मिळणार नाही; तर प्रत्यक्ष पशुधन, पशुपालन, प्रजनन, पोषण आणि व्यवस्थापनाचा अनुभव घेता येणार आहे. प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पशुवैद्यकीय पदवी शिक्षणाची संधी मिळणार आहे.आज पशुधन क्षेत्रात तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांची मोठी गरज आहे. या पार्श्वभूमीवर परळीतील महाविद्यालयातून दरवर्षी प्रशिक्षित पशुवैद्यकीय मनुष्यबळ तयार होणार आहे. बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या पशुधन अर्थव्यवस्थेला याचा दीर्घकालीन फायदा होऊ शकतो.आज शेतकऱ्याच्या अर्थकारणात पशुधनाचा वाटा मोठा आहे. पण पशुधन आजारी पडले, तर अनेकदा योग्य वेळी तज्ज्ञ उपचार मिळणे हीच मोठी अडचण ठरते.याचं वास्तवाला उत्तर देणारे केंद्र परळीत आकाराला येणार आहे. हे एका पिढीचे शिक्षण नव्हे; पुढच्या अनेक पिढ्यांच्या पशुधन अर्थव्यवस्थेला बळ देणारी गुंतवणूक ठरणार आहे. हे केवळ अध्यापनाचे केंद्र न राहता उपचार आणि निदान सुविधांनी युक्त पशुवैद्यकीय केंद्र म्हणून विकसित होणार आहे.मोठ्या व लहान जनावरांसाठी उपचार सुविधा, शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा, क्ष-किरणासारख्या निदान सुविधा, औषध व्यवस्था आणि आवश्यक तांत्रिक मनुष्यबळामुळे परिसरातील पशुपालकांना आधुनिक पशुवैद्यकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शेतकऱ्याच्या गोठ्यातील जनावरापासून विद्यार्थ्याच्या प्रयोगशाळेपर्यंतएकाच संकुलात संपूर्ण साखळी यामाध्यमातून निर्माण होणार आहे. पशुरोगांचे निदान, प्रतिबंध, पशुपोषण, प्रजनन, पशुवंशशास्त्र, पशुधन उत्पादन आणि आधुनिक पशुपालन यासारख्या विषयांमध्ये प्रयोगशाळा व संशोधनाच्या सुविधा विकसित होणार आहेत.यामुळे परळीतील हे केंद्र भविष्यात पशुधनाशी संबंधित संशोधन आणि तांत्रिक




ज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र बनण्याची क्षमता ठेवणारे होणार आहे.शिक्षण ,उपचार ,संशोधन, पशुधन प्रक्षेत्र ,आधुनिक तंत्रज्ञान ,शेतकरी मार्गदर्शन असे हे एकात्मिक पशुसंवर्धन केंद्र निर्माण होणार आहे. या महाविद्यालया साठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची तरतूद करण्यात आली आहे. ९६ शिक्षक, १०४ नियमित शिक्षकेतर कर्मचारी, ७६ बाह्यस्रोत असे २७६ मनुष्यबळ लागणार आहे. यामध्ये प्राध्यापकांपासून सहाय्यक प्राध्यापकांपर्यंत, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांपासून प्रयोगशाळा व क्ष-किरण तंत्रज्ञांपर्यंत तसेच पशुधन प्रक्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. म्हणजेच महाविद्यालय सुरू झाल्यानंतर शिक्षणाबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन किंवा इतर पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, रोगप्रतिबंधक उपाय, पशुपोषण, प्रजनन आणि पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन मिळू शकते. पशुधन निरोगी तर शेतकऱ्याची अर्थव्यवस्था मजबूत या सूत्राला प्रत्यक्ष बळ देणारी सुविधा म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी सांभाळताना पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजना, पशुधन विमा योजना, पशुपालकांसाठी विविध योजना आणि परळीत पशुवैद्यकीय महाविद्यालय अशा माध्यमातून पशुसंवर्धन क्षेत्राला संस्थात्मक बळ देण्यावर भर दिला आहे. परळीतील हा प्रकल्प त्यांच्या कार्यकाळातील दृश्यमान आणि दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या प्रकल्पांपैकी एक ठरणार आहे. परळीची ओळख वैद्यनाथ ज्योतिर्लिंगामुळे देशभर आहे. औष्णिक वीज प्रकल्पामुळे ऊर्जा क्षेत्रातही परळीचे महत्त्व आहे. आता त्यात पशुवैद्यकीय शिक्षण आणि पशुसंवर्धनाचे नवे केंद्र जोडले जाणार आहे. ४१ हेक्टरचा परिसर, कोट्यवधींची गुंतवणूक, पशुधन प्रक्षेत्र, प्रयोगशाळा, उपचार सुविधा आणि २७६ मनुष्यबळाची तरतूद हे चित्र केवळ एका महाविद्यालयाचे नाही. हे परळीच्या बदलत्या विकासाचे चित्र आहे. परळीला मोठ्या शैक्षणिक संस्था आणि आधुनिक सुविधा मिळाव्यात, या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे एक मोठे यश मिळाले आहे.पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून परळीच्या भूमीत उभे राहणारे हे पशुवैद्यकीय संकुल भविष्यात हजारो पशुपालकांना सेवा, शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षण आणि पशुसंवर्धन क्षेत्राला तज्ज्ञ मनुष्यबळ देणारे केंद्र ठरणार आहे. या निमित्ताने आज परळीच्या मातीत एक नवे स्वप्न आकार घेत आहे.

## पान १ वरून...

### दोन ते चार दिवसांत कर्जमाफीची

बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांचा 'ॲग्रीस्टॅक'मध्ये समावेश होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. ॲग्रीस्टॅकमध्ये नोंद झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना कर्जमाफीसह विविध कृषी योजनांचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना १५ दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कर्जमाफीची रक्कम लवकरच खात्यावर जमा होणार असल्याने पात्र शेतकऱ्यांचे लक्ष आता शासनाकडून अद्ययावत होणाऱ्या याद्यांकडे लागले आहे.

---------

### राष्ट्रवादी फक्त शरद

हे राष्ट्रवादी काँग्रेसचे फाउंडर मेंबर आहेत. राष्ट्रवादीचे जे संविधान आहे, त्यामध्ये आमदार आणि खासदार यांचे मतदान नाही. पक्ष ज्याचा आहे, त्यांच्याकडेच राहील, अशी तरदूत त्यात आहे. राष्ट्रवादी पक्ष हा देखील शरद पवार यांचा कालही होता, आजही होता आणि उद्याही आहे.'' असे वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केले आहे. त्या पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या, ''या प्रकरणात आम्ही सर्व पुरावे न्यायालयात सादर केले आहेत. पण निवडणूक आयोगाने आमच्यावर अन्याय केला हे मी जड अंतकरणाने सांगतेय. कारण आम्हाला अशा संस्थावर टीका करायला आवडत नाही. पण दुर्दैवाने निवडणूक आयोगाने अतिशय चुकीच्या पद्धतीने राष्ट्रवादी पक्षावर अन्याय केला असे त्या म्हणाल्या. तसेच शिवसेनेची सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु असताना आम्ही अनेक वेळा राष्ट्रवादीच्या याचिकेसाठीही तारीख मागितली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांच्या याचिकेवर एकत्र घेण्यात यावी, अशी मागणी सुप्रिया सुळेंनी केली. दरम्यान, शिवसेना पक्ष आणि चिन्ह यावर उबाठागट आणि शिंदेसेनेच्या नेत्यांकडून आरोप प्रत्यारोप केले जात आहे. दोन्ही बाजूंच्या नेत्यांनी याविषयी भाष्य करत अनेक दावे देखील केले आहेत. यावर सुप्रिया सुळेंनी महत्वाची प्रतिक्रिया दिली. ''शिवसेना पक्षाची स्थापना बाळासाहेब ठाकरेंनी केली. त्यांच्या हयात त्यांनी या पक्षाची जबाबदारी उद्धव ठाकरेंकडे सोपवली. त्यामुळे शिवसेना ही उद्धव ठाकरे यांचीच आहे.'' असे त्या म्हणाल्या.

-------------

### बीडमध्ये संतापजनक प्रकार: स्व.विलास घुले

या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्याय मागण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली. टाकळी (तालुका केज) येथील व्यावसायिक विलास घुले यांच्या हत्येप्रकरणी आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी त्यांचे कुटुंब मागील १० दिवसांपासून उपोषणाला बसले होते. मात्र, प्रशासनाकडून आंदोलनाची कोणतीही दखल घेतली गेली नाही. शुक्रवारी, स्थानिक वृत्तवाहिनीशी बोलत असताना स्व. विलास घुले यांच्या पत्नी सुष्मा घुले यांनी थेट विषारी औषध प्राशन करून आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. विष प्राशन करण्यापूर्वी त्यांनी ''आता माझा तरी जगून काय उपयोग'' अशी हवालदिल प्रतिक्रिया दिली, ज्यामुळे उपोषणस्थळावर एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे, बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनित्राताई पवार या ध्वजारोहणासाठी येणार आहेत, त्याचवेळी हा प्रकार घडला. ही घटना घडत असताना आणि उपोषण सुरू असताना पालकमंत्र्यांनी आपला मार्ग बदलल्याची चर्चा आहे. प्रशासनाचा ही असंवेदनशीलता आणि दुर्लक्षाविरोधात सर्वसामान्य नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर शिस्टमंडळाने पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेवून या संदर्भात चर्चा केली. व निवेदन दिले यावेळी उपमुख्यमंत्री यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालुन न्याय केला जाईल असे म्हणाल्या.

----------

### जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जात

महत्त्वाचा बदल म्हणजे जात नोंदवली जाणार आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी जनगणनेत जातविषयक माहितीचा समावेश करण्याचा निर्णय घेतला होता. जनगणनेच्या प्रश्नावलीत नागरिकांना त्यांची जात सांगावी लागणार आहे. जनगणना कर्मचारी सर्वप्रथम व्यक्तीचे नाव, कुटुंबातील प्रमुखाशी असलेले नाते, लिंग, जन्मतारीख आणि वय यासारखी माहिती विचारतील. यानंतर वैवाहिक स्थिती, लग्नाच्या वेळीचे वय, पती किंवा पत्नीचे नाव आणि नागरिकत्व याबाबत प्रश्न विचारले जातील. धर्म, जात, आई-वडिलांची माहिती आणि दिव्यांगत्वाबाबतही माहिती घेतली जाणार आहे. नागरिकांच्या शिक्षणाची माहितीही जनगणनेत नोंदवली जाणार आहे. यामध्ये मातृभाषा आणि इतर येणाऱ्या भाषा, साक्षरता आणि डिजिटल साक्षरता यांचा समावेश आहे. नागरिकांच्या रोजगाराची स्थिती समजून घेण्यासाठीही प्रश्नावलीत अनेक प्रश्न आहेत. गेल्या एका वर्षात काम केले आहे का, तुमचा व्यवसाय किंवा नोकरी कोणत्या प्रकारची आहे, तुम्ही कोणत्या उद्योग किंवा सेवेशी संबंधित आहात आणि तुम्ही कोणत्या प्रकारचे कामगार आहात, याची माहिती घेतली जाणार आहे. तसेच सध्या काम शोधत आहात का किंवा काम करण्यासाठी उपलब्ध आहात का, कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी कोणते साधन वापरता, याबाबतही माहिती विचारली जाणार आहे. एखाद्या व्यक्तीने स्थलांतर केले असल्यास त्यामागचे कारण काय होते आणि सध्याच्या गावात किंवा शहरात किती काळापासून राहत आहात, याची माहितीही घेतली जाणार आहे. यामुळे देशातील लोकसंख्येचे स्थलांतर कोणत्या कारणांमुळे होत आहे, याचा अंदाज घेण्यास मदत होऊ शकते. याशिवाय जनगणनेच्या प्रश्नावलीत कोविड-१९ लसीकरणाशी संबंधित प्रश्नाचाही समावेश करण्यात आला आहे. नागरिकांनी कोविडची लस कुठे घेतली, याची माहिती विचारली जाणार आहे. याशिवाय कुटुंबाकडे एकूण किती बँक खाती आहेत, याची माहितीही घेतली जाणार आहे. जनगणना ही केवळ देशात किती लोक राहतात हे मोजण्याची प्रक्रिया नाही. नागरिकांचे शिक्षण, रोजगार, स्थलांतर, भाषा, सामाजिक रचना आणि इतर अनेक बाबींची माहिती यामधून मिळते. यावेळी जातविषयक माहितीचा समावेश आणि आधार, मोबाइल, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट यांसारख्या तपशीलांचा समावेश असल्याने आगामी जनगणना विशेष महत्त्वाची ठरणार आहे. मात्र नागरिकांनी कोणतीही माहिती देण्यापूर्वी जनगणना कर्मचाऱ्यांची अधिकृत ओळख आणि प्रक्रियेची खात्री करणे महत्त्वाचे आहे.

------------

### स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील

गुन्हेगारांना अटक करणे यासाठी केलेल्या उल्लेखनीय शौर्यपूर्ण कार्याबद्दल शौर्य पदक प्रदान केले जाते. यंदा देशभरात एकूण ३०१ शौर्य पदके जाहीर करण्यात आली आहेत. त्यामध्ये २७२ पोलीस कर्मचारी आणि २९ अग्निशमन सेवा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यात महाराष्ट्रातील २० पोलीस कर्मचारी आणि १३ अग्निशमन सेवा कर्मचाऱ्यांना शौर्य पदके जाहीर झाली आहेत. सेवेतील विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रपती पदक (विशिष्ट सेवेसाठी) प्रदान केले जाते, तर कौशल्यपूर्ण कार्यपद्धती, कर्तव्यनिष्ठा, समर्पण आणि उल्लेखनीय सेवेसाठी गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक प्रदान केले जाते. यंदा देशभरात एकूण ९२ पदके विशिष्ट सेवेसाठी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये ८३ पोलीस सेवा, ४ अग्निशमन सेवा, ३ नागरी संरक्षण व होमगार्ड सेवा आणि २ सुधारात्मक सेवा यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील ३ पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि २ सुधारात्मक सेवा कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदक (विशिष्ट सेवेसाठी) जाहीर झाले आहे. तसेच, देशभरात गुणवत्तापूर्ण सेवेसाठी एकूण ६६४ पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये ६०६ पोलीस सेवा, २८ अग्निशमन सेवा, १८ नागरी संरक्षण व होमगार्ड सेवा आणि १२ सुधारात्मक सेवा यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील ३७ पोलीस कर्मचारी, २ अग्निशमन सेवा कर्मचारी, ३ नागरी संरक्षण व होमगार्ड सेवा कर्मचारी आणि २ सुधारात्मक सेवा कर्मचारी यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झाले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून दरवर्षी देशातील पोलीस, अग्निशमन, नागरी संरक्षण व होमगार्ड आणि सुधारात्मक सेवांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्या शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ही पदके जाहीर केली जातात.

------------

### मनोज जरांगे मानसिकदृष्ट्या विकृत, त्यांच्यावर

रहांगडाले यांनी प्रत्युत्तर देत मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. गोंदियामध्ये भाजप आमदार विजय रहांगडाले यांनी प्रासर माध्यमांशी संवाद साधला, यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. जरांगे पाटील हे मानसिकदृष्ट्या विकृत स्वभावाचे असून त्यांच्यावर योग्य संस्कार झालेले नाहीत, अशी घणाघाती टीका रहांगडाले यांनी केली. राजकारणात आणि सार्वजनिक जीवनात कोणावरही टीका करताना भाषेची मर्यादा आणि आचारसंहिता पाळणे अत्यंत गरजेचे असते. टीका सकारात्मक किंवा योग्य दृष्टिकोनातूनही करता येते, मात्र मनोज जरांगे पाटील हे अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका करतात असे भाजपचे आमदार विजय रहांगडाले म्हणाले. कोणाला काय आणि कसे बोलावे याचे भान त्यांना उरलेले नाही, असेही विजय रहांगडाले म्हणाले. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच पश्चिम महाराष्ट्राचा दौरा केला आहे. यामध्ये त्यांनी सोलापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यातील विविध ठिकाणी इशारा बैठका घेतल्या. या काळात मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केल्याचे पाहायला मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर देखील जोरदार टीका केली. त्याचबरोबर कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मुद्यावरुन मनोज जरांगे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर देखील जोरदार टीका केली. यानंतर भाजप आक्रमक झाली आहे.

------------

### महाराष्ट्राची ट्रिलियन डॉल

विविध देशांचे महावाणिज्य दूत, कौन्सुलर कॉर्प्सचे डीन आणि पोलंडचे महावाणिज्य दूत थॉमस, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मंत्री छगन भुजबळ, मंगलप्रभात लोढा, आदिती तटकरे, राज्यमंत्री योगेश कदम, महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक असून समावेशकता, सहिष्णुता आणि विविध विचारांचा स्वीकार ही देशाची वैशिष्ट्ये आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक घडामोडींमध्ये निर्णायक भूमिका बजावणारा देश म्हणून उदयास येत आहे. जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने स्थान प्राप्त केले असून लवकरच पाच ट्रिलियन डॉलर्सपेक्षा मोठ्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या दशकात भारताने गरिबी निर्मूलन, पायाभूत सुविधा विकास, नवकल्पना, तंत्रज्ञान आणि मानव संसाधन निर्मिती या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. भारतीय प्रतिभेने केवळ देशातीलच नव्हे तर जागतिक उद्योगविश्वालाही दिशा दिली आहे. हा नवा भारत विकासाचे नवे मानदंड निर्माण करीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याची औद्योगिक, तांत्रिक आणि नवोन्मेष क्षेत्रातील आघाडी अधोरेखित केली. महाराष्ट्र हा देशाचा उत्पादन क्षेत्रातील अग्रणी प्रदेश, तंत्रज्ञान केंद्र, स्टार्टअपची राजधानी आणि गुंतवणुकीचे प्रमुख आकर्षण केंद्र असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई ही केवळ आर्थिक, व्यावसायिक आणि मनोरंजन क्षेत्राची राजधानी नसून जागतिक गुंतवणूक आकर्षित करणारे महत्वाचे केंद्र बनत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई आणि नवी मुंबई परिसर देशाची डेटा सेंटर राजधानी म्हणूनही उदयास येत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यात उभारण्यात येत असलेल्या वाढवण बंदराचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारताच्या सागरी सामर्थ्याला नवी दिशा देणारा हा प्रकल्प ठरणार आहे. सध्या देशातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू बंदरापेक्षा हे बंदर तीनपट मोठे असेल आणि जगातील अव्वल दहा बंदरांमध्ये त्याचा समावेश होईल. पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात विकसित होत असलेल्या 'तिसऱ्या मुंबई'ची संकल्पना आता प्रत्यक्षात आकार घेत आहे. एज्युकेशन सिटी, मेडी सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी, जीसीसी सिटी आणि नव्या व्यावसायिक जिल्ह्यांच्या माध्यमातून जागतिक दर्जाची शहरी परिसंस्था निर्माण केली जात आहे. तसेच वाढवण बंदर ते विरार या परिसरात 'चौथी मुंबई' विकसित करण्याची संकल्पना पुढे नेण्यात येत असून देशातील पहिले ऑफशोअर विमानतळ आणि मुंबई महानगर क्षेत्रातील तिसरे विमानतळ पालघर जिल्ह्यात उभारण्याची राज्याची महत्वाकांक्षा असल्याचे सांगितले. महाराष्ट्र हे देशातील पहिले ट्रिलियन डॉलर्सचे उपराष्ट्रीय अर्थकारण असलेले राज्य बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून २०२९-३० पर्यंत हे उद्दिष्ट साध्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. भारत अधिक न्याय्य, समावेशक आणि समन्वयाधारित जागतिक व्यवस्थेच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देत राहील, असेही सांगितले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातील प्रगतीची माहिती देणारी ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली.

--------------

## थोडक्यात



### स्वातंत्र्य दिन २०२६ निमित्त प्रियदर्शनी प्राथमिक शाळेची तिरंगा रॅली संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये स्वातंत्र्यदिन सोहळा २०२६ निमित्त शासन आदेशानुसार हर घर तिरंगा अभियानांतर्गत आज दिनांक १३ ऑगस्ट २०२६ गुरूवार रोजी तिरंगा रॅली काढण्यात आली यावेळी शा.व्य.समितीचे श्रीकांत लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व मु.अ. श्री मोरे सर यांच्या नियोजनातून स.शि. श्री माताडे सर व मदतनीस श्रीमती गायके मॅडम यांच्या सहकार्यातून प्रथम शाळेत राष्ट्रगीत घेण्यात आले त्यानंतर शाळेपासून तिरंगा रॅलीला सुरुवात करण्यात आली तिरंगा रॅली शाळा परिसर, बस स्टँड परिसर ,माऊली नगर परिसर या परिसरातून काढण्यात आली यावेळी तिरंगा रॅलीत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी हाती तिरंगा ध्वज घेऊन भारत माता की जय , हर घर तिरंगा, असा जयघोष करत संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला, रॅलीच्या समारोप शाळेत येऊन करण्यात आला.

### शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी शेख एजाज, तर उपाध्यक्षपदी अलीम शेख यांची निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील शालेय शिक्षण समितीची निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. यावेळी समितीच्या अध्यक्षपदी शेख एजाज यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर उपाध्यक्षपदी शेख अलीम यांची निवड झाली.



नवनिर्वाचित अध्यक्ष शेख एजाज यांनी सर्व पालकांचे आभार मानत शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासोबतच शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शालेय शिक्षण समितीच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांचे शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.यावेळी उपळी गावचे उपसरपंच विनायक शेळके, सामाजिक कार्यकर्ते अयुब शेख (हारून भाई), नवाज शेख, खय्युम शेख, सलीम शेख, फेरोज शेख, दत्ता इचके यांच्यासह पालक, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री साहेब खरीप पीक विम्याचे वचन पाळा नसता तिव्र आंदोलन- भाई घोलप

पाटोदा । प्रतिनिधी

आपण मागील खरीप हंगाम २०२५ मध्ये सततचा पाऊस व अतिवृष्टी यामुळे बाधीत झालेल्या बीड जिल्हयातील जवळपास पावने दोन लाख शेतकऱ्यांना पंतप्रधान पिकविमा योजनेमधुन सरसकट नुकसान भरपाई म्हणून हेक्टरी १७५०० रुपये जाहिर केलेले होते. मुख्यमंत्री साहेब आपले राज्य म्हणजे रामराज्य असे आपण सतत जनतेमध्ये संवाद साधताना बोलत असतात. परंतु रामायणात तर श्रीराम हे वचनाला जागणारे दाखवलेले महापुरुष आहेत. आपण तर शेतकऱ्याप्रती शेतकऱ्यांना दिलेले वचन पाळत नाहीत. आपण आम्हा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलेले पंतप्रधान पीकविम्याचे आश्वसन म्हणजे वचन पाळावे आणि शेतकऱ्यांना २०२५ चा खरीप पीक विमा तात्काळ द्यावा नसता बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्षाकडून येणाऱ्या काळात तिव्र आंदोलन करण्यात येईल अशा विषयाचे लेखी निवेदनाव्दारे भाई विष्णुपंत घोलप यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना कळविले आहे. तसेच माहितीस्तव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, मंत्री पंकजाताई मुंडे, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग(बप्पा) सोनवणे, शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांना पाठविले आहे.

# आवश्यक सुविधा देऊन बीडच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा द्या - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बीडच्या क्रीडा संकुलाला 'सरप्राईज व्हिजीट!'

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज बीड जिल्हा क्रीडा संकुलाला अचानक भेट देऊन तेथील विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी क्रीडा संकुलात सराव करणाऱ्या खेळाडू, विद्यार्थी आणि युवकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेतल्या.

क्रीडा संकुलात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती आणि उपलब्ध सुविधांची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतली. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी युवकांचा सहभाग आणि नव्या खेळाडूंना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.



बीड जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना त्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा, यासाठी आवश्यक त्या मूलभूत सुविधा, सरावासाठी योग्य वातावरण आणि आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच क्रीडा संकुलातील कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी क्रीडा संकुलात उपस्थित असलेल्या मुलांशी त्यांनी आस्थेने संवाद साधला. कोणत्या खेळाचा सराव करता, कोणत्या सुविधा आवश्यक आहेत, प्रशिक्षण घेताना कोणत्या अडचणी येतात, याबाबत त्यांनी खेळाडूंकडून माहिती घेतली. बीड जिल्ह्यातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव लौकिक मिळविणारे खेळाडू घडावेत, यासाठी शासनस्तरावर आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे, आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह विविध मान्यवर, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### कायदा मानवी हक्कांच्या संरक्षणाचे प्रभावी साधन असून समाजाच्या प्रगतीत कायद्याची महत्त्वपूर्ण भूमिका -जिल्हा न्यायाधीश डॉ. उमेशचंद्र मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

युवा दिनाचे औचित्य साधून श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव येथे विधी सेवा समिती व माजलगाव वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्यासोबतच त्यांना मानवी हक्क, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश डॉ. उमेशचंद्र मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. नागेश पवार उपस्थित होते. यावेळी माजलगाव वकील संघाचे अध्यक्ष भाई ॲड. नारायण गोले पाटील, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री. पाटील व श्री. शिंदे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य देवर्षी सर




यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. उमेशचंद्र मोरे म्हणाले की, "विद्यार्थ्यांनी युवा दिनाच्या निमित्ताने अभ्यास करून मोठमोठे अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगावे आणि ते पूर्ण करण्यासाठी स्वतःला झोकून द्यावे. ज्ञान, अभ्यास आणि कर्तृत्वाच्या माध्यमातून उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व घडवून चांगला समाज निर्माण करण्यासाठी योगदान द्यावे."कायदा हा मानवी हक्कांच्या संरक्षणाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये कायद्याची महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती घेऊन आपल्या अधिकारांसोबतच कर्तव्यांचीही जाणीव ठेवावी," असे प्रतिपादन डॉ. मोरे यांनी केले.

यावेळी भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी तरुणांनी क्रांतिकारक आणि समाजसुधारकांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. बापू लाड, नागनाथ नाईकवडी यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा आदर्श तरुणांनी समोर ठेवावा, असे त्यांनी सांगितले.

तरुणांनी प्रचंड अभ्यास करून सामाजिक कार्यात झोकून द्यावे आणि समाजातील अन्याय, विषमता व शोषणाविरुद्ध संविधानिक मार्गाने लढा देत समाजाच्या उन्नतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन ॲड. गोले पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटकळ सर यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक तसेच सामाजिक विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य देवर्षी सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. विधी सेवा समिती व माजलगाव वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कायदेविषयक शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कायद्याची माहिती, मानवी हक्क आणि सामाजिक बांधिलकी याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

## पान ६ वरुन...

### ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीचे

संजय शिरसाट यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमात ऊसतोड कामगारांना देण्यात येणारे ओळखपत्र ५ जणांना प्रतिकात्मक स्वरूपात देण्यात आले, तर आरोग्य साथींना हेल्थ कीटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती अंतर्गत कर्जमाफी झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यास बेबाकी प्रमाणपत्र वाटपासह नव्या कर्ज वाटपाची सुरुवात देखील यावेळी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले, तर विभागीय व्यवस्थापक दीपक खरात यांनी आभार मानले.

या सोहळ्यापूर्वी कोनशीला अनावरण करण्यात आले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी फित कापून इमारतीचे उद्घाटन केले. त्यांनी संपूर्ण इमारतीची पाहणी देखील यावेळी केली व काही बाबतीत सूचना देखील दिल्या.संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत राज्यातील ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या ४१ तालुक्यांच्या ठिकाणी, मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ शासकीय वसतिगृह सुरू करण्यास शासनानं मान्यता दिली आहे. त्यापैकी २० शासकीय वसतिगृह सुरु झाली आहेत. या योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात १०० विद्यार्थी क्षमतेची मुलांसाठी १ आणि मुलींसाठी १ वसतीगृह अशी जिल्ह्यात एकूण २२ शासकीय वसतिगृह सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी जिल्ह्यातील ११ वसतिगृहांच्या बांधकामासाठी १५९ कोटी ३६ लक्ष ६० हजार इतक्या रकमेच्या बांधकाम अंदाजपत्रकास यापुर्वीच प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आरोग्य, निवारा, पिण्याचे पाणी, शौचालय, बाल संगोपन, कागदपत्र आणि सरकारी योजनांचा लाभ या ऊसतोड कामगारांना झाला पाहीजे, हीच शासनाची भूमिका आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास ऊसतोड कामगार व त्यांचे पाल्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युसूफवडगांव ग्रामपंचायतीचा

व समस्या दूर करण्यासाठी असते; मात्र या निर्णयामुळे नागरिकांसाठी नवीन अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे संबंधित व्हॉल्व्ह तातडीने दुसऱ्या योग्य ठिकाणी स्थलांतरित करून रहदारी सुरळीत करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहेशेतकरी

पहिले तर हा रस्ता ६६ फुटांचा होता पण गाव हद्दीत दोन्ही बाजुंनी नागरिकांनी अतिक्रमण करून १०/१५ फुटा रस्ता आणला आहे,त्यात ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी पाणी सोडण्याचे व्हॉल्व्ह रस्त्याचा मधोमध बसवल्याने रस्ता अजुनच अरुंद झाला आहे, मग आम्ही शेतात ये जा कसे करायचे आणि ऊस तोड हंगामात मोठी वाहने शेतात कशी जाणार तरी हे व्हॉल्व्ह काढुन ग्रामपंचायतने दुसऱ्या जागी बसवावेत ऐवढी मागणी आहे.

शांताराम थळकरी, ग्रामस्थ व शेतकरी

### घाटनांदुर येथे खाजगी

नागरगोजे कडून होत असलेल्या कथीत त्रासामुळे त्यांनी हे पाऊल उचललेले आहे असे त्यांच्या कुटुंबाकडून सांगण्यात आले आहे या घटनेमुळे खाजगी सावकारांच्या वाढत्या प्रकाराबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून संबंधित खाजगी सावकार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कुटुंबाकडून तीन ते चार दिवस झाले करण्यात येत आहे मात्र पोलीस प्रशासन टाळाटाळ करत असल्याचा आरोप कुटुंबाकडून होत आहे या घटनेची योग्य तपासणी करून खाजगी सावकारा विरुद्ध पोलीस प्रशासन काय कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे

### युसूफवडगाव येथे पीएम

असे आवाहन सरपंच सौ. सुलक्षणाताई गायके यांनी केले.तसेच ज्या पात्र नागरिकांची नावे यावेळी यादीत समाविष्ट झाली नाहीत, त्यांना पुढील टप्प्यात घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत निश्चित प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे युसूफवडगावातील अनेक गरजू कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

### उद्योजक अशोक चौधरी

आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून विविध उपक्रमांना चालना मिळत आहे. सावरगाव मायंबा श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थानाच्या विकासासाठीही भाविक, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि दानशूर व्यक्ती पुढे येत आहेत. अशोक शेठ चौधरी आणि त्यांच्या मित्रपरिवाराने श्रद्धेने दिलेल्या या १ किलो चांदीच्या देणगीबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक बांधिलकी जपत देवस्थानाच्या विकासासाठी केलेले हे योगदान इतरांसाठीही प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. देवस्थानाच्या पावतीवर देवस्थान व्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी रोख अथवा वस्तूरूपाने देणगी स्वीकारली जात नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे भाविकांनी देवस्थानाच्या विकासासाठी देणगी देताना अधिकृत पावती घेऊनच देणगी द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. युवा नेते जयदत्त धस,माऊली जरांगे,महेंद्र गर्जे,ज्ञानेश्वर चौधरी,सचिन चौधरी, सुरेश सोनवणे, अध्यक्ष दादासाहेब चितळे, सरपंच राजेंद्र मस्के,सचिव बाबासाहेब मस्के,अमोल शिंदे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

### महंत जनार्दन महाराजांच्या कीर्तनाने

गाथा भजन, प्रवचन हरिपाठ आदी पार पडलेल्या कार्यक्रमामुळे या संस्थांनच्या मोठे गोकुळाचे स्वरूप प्राप्त झाले होते. पंचक्रोशीतील भाविक भक्तांसाठी ग्रामस्थांच्या वतीने महाराष्ट्रभरातील नामांकित कीर्तनकारांची कीर्तने ही आयोजित करण्यात आली होती. यामुळे हा सप्ताह म्हणजे भाविकांसाठी एक आध्यात्मिक पर्वणीच होती. याचा लाभ गेली आठ दिवस पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने घेत होती. गेल्या आठ दिवसापासून चालू असलेल्या या खेळीमेळीच्या वातावरणातील सप्ताहाची सांगता आज महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. यावेळी महंत रामेश्वर महाराज शास्त्री,गिरीधारी महाराज शेळके, मुळे महाराज,राम महाराज देवकर, नशिकेत महाराज जरे, अनिल महाराज जरांगे, भाऊसाहेब महाराज इंगोले, गणेश महाराज नावडे,दत्ता महाराज भालेकर, सुदाम महाराज देवकर, दत्ता महाराज सटले, लहू महाराज देवकर, अर्जुन (बप्पा) खेडकर, दादासाहेब थिटेआदीसह पंचक्रोशीतून हजारो भाविकांची उपस्थिती लाभली होती.

### शिवसेना शेतकरी आघाडीच्या बीड जिल्हाप्रमुखपदी प्रा.अशोक पवार

पिंपळवंडी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागातील पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील युवा शिवसैनिक व सामाजिक कार्यकर्ते प्रा. अशोक (तात्या) मधुकरराव पवार यांची शिवसेना शेतकरी आघाडीच्या बीड जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे,संसदरत्न खा.श्रीकांत शिंदे,रोहयो मंत्री भरतशेठ गोगावले यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते प्रा. पवार यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.जिल्हाप्रमुख स्वप्नील भैया गलधर यांच्या आदेशानुसार तसेच राहुल तात्या चौरे यांच्या सहकार्याने प्रा.अशोक पवार यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.ग्रामीण भागातील तळागाळातील कार्यकर्त्यांना पक्षसंघटनेत महत्त्वाची जबाबदारी देण्याच्या शिवसेनेच्या भूमिकेचे हे उदाहरण असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.शेतकरी आणि ग्रामीण भागातील विविध प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या युवा कार्यकर्त्याला जिल्हास्तरीय जबाबदारी मिळाल्याने पिंपळवंडी तसेच आष्टी विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.नियुक्तीनंतर प्रा.अशोक (तात्या) पवार यांनी वरिष्ठ नेत्यांचे आभार मानत सांगितले,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांसह सर्व वरिष्ठ मान्यवरांनी माझ्यावर विश्वास दाखवून ही जबाबदारी दिल्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. मिळालेल्या संधीचा



उपयोग पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे करणार आहे. आष्टी विधानसभा कार्यक्षेत्रात शिवसेना शेतकरी आघाडी अधिक मजबूत करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करेन.आष्टी विधानसभा कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी लवकरच विविध गावांमध्ये बैठका घेण्यात येणार असून,शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याची तयारी प्रा. पवार यांनी व्यक्त केली आहे.त्यांच्या नियुक्तीबद्दल शिवसैनिक,पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### बाजरी व मका उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २५०० रुपये अनुदान मिळणार -प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी



खरीप हंगामात बाजरी व मका पिकांची पेरणी केलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाच्या योजनेतून अनुदानाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियान अन्नधान्य पिके योजनेअंतर्गत २०२६-२७ प्रकल्पा बाहेरील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व एकात्मिक कीड व्यवस्थापन या बाबीसाठी शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी यांनी केले आहे शेतकऱ्यांनी संबंधित पिकासाठी कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या निविष्ठा स्वतःच्या पसंतीने खुल्या बाजारातून खरेदी करणे आवश्यक आहे खरेदी केलेल्या निविष्ठांच्या किमतीच्या ५०% किंवा प्रति हेक्टरी अडीच हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी बाजरी व मका पिकासाठी वापरलेल्या शिफारशीत निविष्ठाची खरेदी केल्याची मूळबिले संबंधित कृषी सहाय्यक यांच्यामार्फत तालुका कृषी कार्यालयात जमा करावीत असे आव्हान ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangigmail.com PHno02483-271787
जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-७३५ दिनांक: १४/०८/२०२०

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार छगन सोमा पडुळकर रा. साई बाबा, सेलू रोड, परतुर ता. परतुर जि. जालना यांनी नामे दिगंबर काळुराम सोळंके रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. २५८६ दि. १३/०८/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. ९२६ दिनांकः १४/०८/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. दिगंबर काळुराम सोळंके रा.ता. घनसावंग जि. जालना नावावर असलेला गट नं (७१) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १४२९/३-मधील क्षेत्र १३९.४० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिमेस : सरकारी रोड
दक्षिणेस :- गुलाब अहेमद शेख बाबु यांची जागा
उत्तरेस :- संतोष परमेश्वर राऊत यांची जागा

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र १३९.४० चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेह

काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आन लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साट कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगर पंचायत घनसावंगी

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangigmail.com PHno02483-271787
जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-७३० दिनांक: १४/०८/२०२०

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रविंद्र प्रकाश पवार रा. खडका ता. घनसावंगी जि.जालना यांनी नामे १. मच्छिंद्र रावजी सोळंके २. हौसाबाई पंढरीनाथ सोळुंके रा. डहाळेगांव ता.घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. १६०१ दि. २०/०५/२०२१ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. ५३१ दिनांक:- ०१/०६/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. मच्छिंद्र रावजी सोळंके २. हौसाबाई पंढरीनाथ सोळुंके रा. डहाळेगांव ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (५१) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७१०/६९ मधील क्षेत्र १४९.७८ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- सरकारी रोड
पश्चिमेस :- हमीद गुलाब बागवान यांचा प्लॉट
दक्षिणेस :- नामदेव बबन सोळुंके यांचा प्लॉट
उत्तरेस :- ज्ञानेश्वर जिजाभाऊ आनंदे यांचा प्लॉट

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र १४९.७८ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगर पंचायत घनसावंगी

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangigmail.com PHno02483-271787
जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-७३१ दिनांक: १४/०८/२०२०

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मच्छिंद्र रावजी सोळंके रा. डहाळेगांव ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे नय्युम गफुर सय्यद रा.ता.घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. ३२६५ दि. २५/०५/२०२१ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. ५३६ दिनांक:- ०२/०६/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. नय्युम गफुर सय्यद रा. ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (२४१) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७१०/७१ मधील क्षेत्र १०१.२० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे. -

पुर्वेस :- रस्ता
पश्चिमेस :- विक्रेत्याची उर्वरीत जागा
दक्षिणेस :- कैलास तुकाराम हेमके व अन्य यांची जागा
उत्तरेस :- अंबड घनसावंगी रोड -

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र १०१.२० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगर पंचायत घनसावंगी

# कृषी समृद्धीचे थकीत अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा, ६०० कोटी निधी मंजूर

मुंबई / प्रतिनिधी

कृषी समृद्धी योजनेअंतर्गत २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ६०० कोटी निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. यातून सूक्ष्म सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना व मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत असलेले थकित अनुदान अदा केले जाणार आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी, पशुसंवर्धन विभागाने जारी केला आहे.



राज्य मंत्रिमंडळाने २९ एप्रिल २०२५ रोजी प्रचलित अनुदानाच्या मर्यादेत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) तत्त्वावर नवीन योजना राबविण्यास व त्यासाठी २०२५-२६ ते सन २०२९-३० या ५ वर्षांत दरवर्षी ५ हजार कोटी याप्रमाणे एकूण २५ हजार कोटींची तरतूद करण्यास मंजुरी दिली होती. त्या अनुषंगाने कृषी समृद्धी योजना सुरू करण्यात आली. तसेच २२ जुलै २०२५ च्या शासन निर्णयाच्या माध्यमातून या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या होत्या. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कृषी समृद्धी योजनेच्या अंमलबजावणीसाठी २ हजार कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली. कृषी आयुक्तांनी २४ जून २०२६ च्या प्रस्तावास अनुसरून सूक्ष्म सिंचन, कृषि यांत्रिकीकरण आणि मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी ६०० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. यात सूक्ष्म सिंचन (प्रति थेंब अधिक उत्पादन) योजनेसाठी १६० कोटी, कृषी यांत्रिकीकरणासाठी ४२० कोटी आणि मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रिया योजनेसाठी २० कोटी निधीचा समावेश आहे.वितरित करण्यात आलेला हा निधी त्या-त्या योजनांतर्गत थेट लाभ हस्तांतरणद्वारे केवळ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात करण्यात येणार आहे.

काय आहे कृषी समृद्धी योजना?

शेती क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा उभारणे, उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण, मूल्य साखळी मजबूत करणे, तसेच हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचा कृषी समृद्धी योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ड्रोन, शेततळे, प्लास्टिक अस्तरीकरण, सुविधा केंद्र आणि ट्रॅक्टर चलित रुंद सरी वरंबा यंत्रांसाठी सरकारकडून अनुदान देण्यात येते.

## असा टाळा मोहरी पिकावरील चेंपाचा प्रादुर्भाव



चेंपा किडी किंवा कीटक हलका हिरवा-पिवळा रंगाचा असून तो वनस्पतीच्या विविध मऊ भागांवर, फुले, कळ्या आणि फळांवर राहतो आणि लहान गटांमध्ये आढळणारा रस शोषून घेतो. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते. कळ्यांची संख्या कमी होऊन फुलांच्या उत्पन्नावरही परिणाम होतो. हवामानातील चढ-उतारांमुळे मोहरी पिकांवर चेंपा (मोयला) किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. चेंपा कीटक थंडीच्या मोसमात पसरतो. जेव्हा तापमान १० ते २० अंश सेल्सिअस दरम्यान असते. अशा परिस्थितीत हवामानातील आर्द्रता वाढते. त्यामुळे चेंपा किडीचा प्रादुर्भाव होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे त्याचा परिणाम उत्पन्नावर होतो. राजस्थान सरकारच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांना चेंपा किडीच्या प्रतिबंधासाठी आवश्यक सल्ला दिला आहे. या किडींना रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना न केल्यास पीक उत्पादनावर परिणाम होऊ शकतो, असे कृषी विभागाने म्हटले आहे. अशा परिस्थितीत वेळीच कीटकनाशकांचा वापर करून या किडींवर नियंत्रण ठेवण्याचा सल्ला कृषी विभागाच्या अधिकारी व पर्यवेक्षकांनी दिला आहे.

चेंपा किटक झाडांची वाढ थांबवते : हा कीटक हलका हिरवा-पिवळा रंगाचा असून तो वनस्पतीच्या विविध मऊ भागांवर, फुले, कळ्या आणि फळांवर राहतो आणि लहान गटांमध्ये आढळणारा रस शोषून घेतो. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते. कळ्यांची संख्या कमी होऊन फुलांच्या उत्पन्नावरही परिणाम होतो.

चेंपा किडीचे व्यवस्थापन : चेंपा किडीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर काही दिवसात जेव्हा झाडाच्या मुख्य फांदीची लांबी सुमारे १० सेमीपर्यंत वाढते. जेव्हा चेम्पाची संख्या सुमारे २० ते २५ पर्यंत वाढते, तेव्हा प्रस्तावित प्रमाणात मॅलाथिऑन ५ टक्के टाका, २५ कि.ग्रॅ. प्रति हेक्टर, १.२५ लिटर प्रति हेक्टर ५० ईसी किंवा डायमेथोएट ३० ईसी, एक लिटर औषध ४०० ते ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

## शेतीसोबत ससेपालन व्यवसाय सुरु करा; अल्पावधीत होईल लाखोंची कमाई!

ससा हा असा प्राणी आहे, जो प्रत्येक व्यक्तीला आवडतो. दिसायला अतिशय सुंदर आणि मनमोहक आहे, जे पाहून लोकांचे मन आनंदाने आणि प्रेमाने भरून जाते. ससेपालन शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर ठरू शकते. शेतीसोबत शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेतकरी ससेपालनाचा व्यवसाय करू शकतात. यातून मिळणारा फायदाही चांगला मिळू शकतो. प्राणीप्रेमींचा ससा हा अतिशय गोंडस प्राणी आहे. शहरांमध्ये छंद म्हणूनही त्याचे संगोपन केले जाते. शिवाय व्यवसाय म्हणून देखील ससे पालन केले जाते. ससेपालन पिंजऱ्यात चांगले होऊ शकते.

कसा सुरू करायचा 'हा' व्यवसाय? सर्वप्रथम ससे व्यवसायासाठी अशी जागा निवडा. जिथे कमी वायू आणि ध्वनी प्रदूषण आहे. तसेच, २५ अंश सेंटीग्रेड तापमान आणि सूर्यप्रकाश असावा. कारण अशा ठिकाणी ससा व्यवसाय करणे सोपे जाते. अशा ठिकाणी ससे चांगले वाढतात. तुम्ही १० मादी ससे आणि २ नर सशांसह ससा पालन सहज सुरू करू शकतात. चांगल्या नफ्यासाठी किमान १०० ससे असावेत. जर तुम्हाला सशाच्या व्यवसायातून अधिक कमाई करायची असेल तर तुम्ही आणखी सशांचे संगोपन करु शकतात.

कोणता आहार लागतो ? सशाचा आहार धान्य, गोळ्या किंवा पावडरच्या स्वरूपात असतो. हिरव्या चाऱ्यामध्ये सशांना ओट्स, बेरसीम, राई गवत इत्यादी खायला दिले जाऊ शकते. यांच्या पिल्लांना देखील धान्य बारीक करून खायला द्या. बुरशी लागलेले धान्य शक्यतो टाळा. कारण बुरशी धान्यात रोग असतात वेगवेगळे किटाणू असतात. यामुळे सस्याला धोका निर्माण होऊ शकतो. तसेच ससेपालन करणाऱ्याला सुद्धा आर्थिक नुकसान होऊ शकते. काही प्रमुख जाती : सोव्हिएत चिंचिला, व्हाईट जायंट, ब्लॅक ब्राउन, न्यूझीलंड व्हाईट, ग्रे जायंट, अंगोरा, डच इ. प्रमुख जाती आहेत. ससेपालनासाठी उत्तम ठरतील. ससा पालनाचा खर्च : तुम्ही १०० सशांसह रॅबिट फार्मिंग बिझनेस प्लॅन करू शकतात. यासाठी सुमारे २ लाख रुपये खर्च असेल आणि त्याच वेळी पिंजरा, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था इत्यादीसाठी तुम्हाला किमान अडीच ते तीन लाख रुपये खर्च करावे लागतील. या व्यवसायात एकदा पैसे गुंतवले की फायदा चांगला मिळतो. ससा ३५ ते ४५ दिवसांत आपल्या पिल्लांना जन्म देतो आणि ही पिल्ले ४ महिन्यांची झाली की विक्रीसाठी तयार होत असतात. ससे मुख्यतः मांस आणि लोकरीसाठी पाळले जातात. त्याची मांस उत्पादकता बाजारातील इतर सर्व प्राण्यांपेक्षा जास्त आहे.



## कृषी औजार बँक योजनेसाठी १५ ऑगस्ट पर्यंतची मुदत

महाराष्ट्र शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत ''गावस्तरीय कृषी औजार बँक'' या घटकासाठी नवीन नोंदणी आणि अर्ज करण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. या घटकाचा उद्देश गावातील शेतकऱ्यांना विविध कृषी यंत्रे व अवजारे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे हा आहे. प्रकल्प गावांमध्ये पात्र महिला बचत गट तसेच संबंधित शेतकरी गटांच्या माध्यमातून कृषी औजार बँक स्थापन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.



अर्ज करण्याची अंतिम तारीख : नवीन नोंदणी आणि अर्ज प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२६ आहे. अर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी इच्छुक गटांनी संबंधित प्रकल्प यंत्रणा आणि कृषी विभागाकडून आवश्यक माहिती घेऊन वेळेत अर्ज करणे आवश्यक आहे.

कृषी औजार बँकेत या यंत्राचा समावेश : प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार गावातील प्रमुख पीक आणि स्थानिक गरज लक्षात घेऊन कृषी औजार बँकेत विविध यंत्रांचा समावेश करता येतो. भाताव्यतिरिक्त प्रमुख पिकांच्या गावांसाठी बेड तयार करण्यासाठी बेडमेकर - किमान १ ते कमाल ५. बियाणे टोकण यंत्रे - किमान ५ ते कमाल २५. भात प्रमुख पीक असलेल्या गावांसाठी : भात पेरणी यंत्र - किमान १ ते कमाल ५. भात कापणी यंत्र - किमान १ ते कमाल ३. याशिवाय गावातील पीकरचना आणि गरजेनुसार इतर आवश्यक कृषी यंत्रे घेण्याची मुभा असल्याचे पत्रात नमूद आहे.

कोणती इतर कृषी यंत्रे घेता येऊ शकतात? बीबीएफ यंत्र, भात लावणी/रोवणी यंत्र, कापणी यंत्र, मळणी यंत्र, कंबाईन हार्वेस्टर, बॅटरी/पेट्रोल/ट्रॅक्टरचलित फवारणी पंप, फळबाग लागवडीसाठी खड्डे खोदणारे यंत्र, कॅनोपी व्यवस्थापन यंत्र, फळेतोडणी यंत्र, प्लास्टिक मल्च अंथरणारे यंत्र, कांदा लागवड यंत्र, कांदा काढणी यंत्र, तुषार सिंचन संच, निंबोळी बियांची पावडर करण्यासाठी पल्व्हरायझर, स्वयंचलित पेरणी, आंतरमशागत व फवारणी यंत्रे. डीएसआर यंत्राचा समावेश करण्यावर भर : विशेषतः भात उत्पादक भागांमध्ये डीएसआर यंत्राचा वापर वाढविण्यावर शासनाने भर दिला आहे. या पद्धतीमुळे भात लागवडीमध्ये पाणी आणि बियाण्याची बचत होण्यास तसेच मजुरांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे पात्र गटांनी प्रस्तावित कृषी औजारांमध्ये डीएसआर यंत्राचा समावेश करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

एका गावातून अनेक गटांनी अर्ज केल्यास काय होईल? एखाद्या गावातून एकापेक्षा जास्त गटांचे अर्ज प्राप्त झाल्यास ऑनलाइन लॉटरी पद्धतीने निवड केली जाणार असल्याचे शासनाच्या पत्रात नमूद आहे. नवीन प्राप्त प्रस्तावांची कागदपत्रे तपासण्याची प्रक्रिया अर्जाचा कालावधी संपल्यानंतर जास्तीत जास्त ८ कार्यालयीन दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश आहेत. त्यानंतर परिपूर्ण प्रस्तावांची निवड इपीओ- डीबीटी पोर्टलवरील ऑनलाइन लॉटरी प्रणालीद्वारे तात्काळ करण्याचे सांगण्यात आले आहे.

शेतकरी गटांसाठी महत्त्वाची योजना : गावपातळीवर कृषी यंत्रे उपलब्ध झाल्यास प्रत्येक शेतकऱ्याला स्वतंत्रपणे महागडी यंत्रे खरेदी करण्याची गरज कमी होऊ शकते. औजार बँकेमार्फत उपलब्ध यंत्रे शेतकऱ्यांना वाजवी दरात भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची संकल्पना या घटकात आहे. त्यामुळे लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी यांत्रिकीकरण सुलभ होण्यास मदत होऊ शकते.

इच्छुक गटांनी पुढील बाबी लक्षात ठेवाव्यात : १५ ऑगस्ट २०२६ पूर्वी अर्ज/नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. आपल्या गावातील प्रमुख पीक आणि शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन यंत्रांची निवड करावी. भात उत्पादक भागातील गटांनी डीएसआर यंत्राचा समावेश करण्याचा विचार करावा. आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. अर्जाची प्रक्रिया संबंधित प्रकल्प यंत्रणा/कृषी विभागाच्या सूचनेनुसार पूर्ण करावी. अर्ज केल्यानंतर निवड प्रक्रिया ऑनलाइन लॉटरीद्वारे होऊ शकते, हे लक्षात ठेवावे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय स्वातंत्र्य दिन

### महत्वाच्या घटना

१५१९ : पनामा सिटी शहराची स्थापना झाली.
१६६४ : कुडाळ प्रांतात शिवाजी महाराजांनी खवासखानाला (दुसऱ्यांदा) पराभूत केले.
१८२४ : अमेरिकेतील गुलामगिरी पासून सुटका झालेल्या व्यक्तींनी लायबेरिया हे राष्ट्र निर्माण केले.
१८६२ : मद्रास उच्च न्यायालयाची स्थापना
१९१४ : पनामा कालव्यातुन एस. एस. ॲनकॉन हे पहिले व्यापारी जहाज पार झाले.
१९२९ : ग्राफ झेपेलिन हा संशोधक 'झेपेलिन' बलूनमधून जगप्रवासासाठी रवाना
१९४५ : दुसरे महायुद्ध - जपानने शरणागती पत्करली.
१९४७ : ब्रिटिश राजवट संपून भारत स्वतंत्र झाला. देशाची फाळणी झाली. पश्चिम पंजाब, सिंध,बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत व पूर्व बंगाल हे पाकिस्तानात समाविष्ट झालेले प्रदेश सोडून संस्थाने वगळता राहिलेला प्रदेश स्वतंत्र भारत म्हणून अस्त्त्वात आला.
१९४७ : भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पं. जवाहरलाल नेहरू यांनी सूत्रे हाती घेतली.
१९४७ : पाकिस्तानचे निर्माते मुहम्मद अली जिना यांचा पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून कराची येथे शपथविधी झाला.
१९४८ : दक्षिण कोरिया या देशाची निर्मिती झाली.
१९६० : काँगो देश फ्रांसपासून स्वतंत्र झाला.
१९७१ : अमेरिकन डॉलरचे सोन्याशी असलेले संधान खंडित झाले.
१९७१ : बहरैन देशाला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य मिळाले.
१९७५ : बांगला देशात लष्करी उठाव होऊन बांगला देशाचे संस्थापक शेख मुजीबूर रहमान व त्यांच्या कुटुंबीयांची हत्या करण्यात आली.
१९८२ : भारतात रंगीत दूरचित्रवाणीच्या प्रसारणास सुरूवात झाली.
१९८८ : पंतप्रधान राजीव गांधी यांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणानंतर 'मिले सुर मेरा तुम्हारा' हे गाणे दूरदर्शनवरुन पहिल्यांदाच प्रसारित करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६९ : नेपोलिअन बोनापार्ट - फ्रान्सचा सम्राट, असामान्य सेनापती आणि कर्तबगार प्रशासक (मृत्यू: ५ मे १८२१ सेंट हेलेना)
१७९८ : भारतीय योद्धा संगोली रायन्ना यांचा जन्म. (मृत्यू: १८३१)
१८६५ : रेकी चे निर्माते मिकाओ उस्ई यांचा जन्म. (मृत्यू: १९२६)
१८६७ : गणपतराव जोशी - रंगभूमीवरील असामान्य अभिनेते, शेक्सपियरच्या नाटकांतील त्यांच्या भूमिका अतिशय गाजल्या होत्या (मृत्यू: ७ मार्च १९२२)
१८७२ : योगी अरविंद घोष - क्रांतिकारक, तत्त्वचिंतक, योगी व कवी (मृत्यू: ५ डिसेंबर १९५० पाँडिचेरी)
१८७३ : भारतीय पुरातात्त्विक व इतिहासकार रामप्रसाद चंदा यांचा जन्म. (मृत्यू: २८ मार्च १९४२)
१९०४ : मोटार व्हीलचेअर चे शोधक जॉर्ज क्लाईन यांचा जन्म. (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९२२)
१९१२ : 'सूर रंग' उस्ताद अमीर खाँ - इंदौर घराण्याचे संस्थापक व गायक (मृत्यू: १३ फेब्रुवारी १९७४)
१९१३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' -लेखक व कवी (मृत्यू: ७ सप्टेंबर १९५३)
१९१५ : इस्मत चुगताई - ऊर्दू कथा व पटकथा लेखिका (मृत्यू: २४ आक्टोबर १९९१)
१९१७ : अंबूताई गोरे तथा सरोजिनी मधुसूदन शारंगपाणी - ललित, वैचारिक, नाट्य, काव्य आदी विविध प्रकारांत मोठ्या प्रमाणावर लेखन करणार्या लेखिका. 'दुर्दैवाशी दोन हात' या त्यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाला १९७५ मधे राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १३ नोव्हेंबर २००१)
१९२२ : वामनदादा कर्डक - लोककवी
१९२९ : उमाकांत निमराज ठोमरे - साहित्यिक, अनेकांना लिहिते करणारे, वाचकप्रिय 'वीणा' या दर्जेदार मासिकाचे संपादक, बालसाहित्यकार (मृत्यू: ७ आक्टोबर १९९९)
१९४५ : बेगम खालेदा झिया - बांगला देशच्या पंतप्रधान
१९४७ : राखी - चित्रपट अभिनेत्री
१९५८ : सिंपल कपाडिया - अभिनेत्री आणि वेशभूषाकार (मृत्यू: १० नोव्हेंबर २००९)
१९६१ : भारतीय अभिनेत्री आणि पटकथालेखक सुहासिनी मणिरत्नम यांचा जन्म.
१९६४ : बिल आणि मेलिंडा गेट्स फाऊंडेशन च्या सह-संस्थापिका आणि बिल गेट्स यांच्या पत्नी मेलिंडा गेट्स यांचा जन्म.
१९७१ : भारतीय गायक आणि संगीतकार अदनान सामी यांचा जन्म.
१९९२: भारतीय बुद्धिबळपटू भास्करन आडहान यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१०५७ : स्कॉटलंडचा राजा मॅक बेथ यांचे निधन.
१११८ : कॉम्नेनस, बायझेन्टाईन सम्राट ॲलेक्सियस (पहिला) यांचे निधन.
१९३५ : अमेरिकन अभिनेते विल रॉजर्स यांचे निधन.
१९४२ : महादेव देसाई - स्वातंत्र्य लढ्यातील नेते आणि महात्मा गांधींचे स्वीय सहाय्यक (जन्म: १ जानेवारी १८९२)
१९७४ : स्वामी स्वरुपानंद यांनी समाधी घेतली (जन्म: १५ डिसेंबर १९०३)
१९७५ : शेख मुजीबुर रहमान - बांगलादेशचे संस्थापक व पहिले राष्ट्राध्यक्ष यांची लष्करातील सैनिकांनी त्यांच्या प्रासादावर हत्या केली. (जन्म: १७ मार्च १९२०)
२००४ : अमरसिंग चौधरी - गुजरातचे मुख्यमंत्री (जन्म: ३१ जुलै १९४१)
२००५ : भारतीय त्वचाशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक बँडापुडी वेंकट सत्यनारायण यांचे निधन. (जन्म: ३० जानेवारी १९२७)



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

शनिवार दि.१५ ऑगस्ट २०२६ ५



# नाफेड ज्वारी खरेदी केंद्रावर लाखोंच्या अनियमिततेचे आरोप

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू

जालना। प्रतिनिधी

जाफ्राबाद तालुक्यातील नाफेड ज्वारी खरेदी केंद्रातील कथित अनियमिततेचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. ज्वारी खरेदी प्रक्रियेत शासनाच्या नियमांचे उल्लंघन, शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा, बनावट नोंदी, नियमबाह्य खरेदी आणि लाखो रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचे आरोप करत सामाजिक कार्यकर्ते पठाण सलमानखान अजीजखान यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे., दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.




मागण्यांवर प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही कारवाई करावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. असा इशाराही त्यांनी दिला आहे.तक्रारीत नमूद केल्यानुसार, जाफ्राबाद तालुक्यातील नाफेड अंतर्गत ज्वारी खरेदी प्रक्रियेमध्ये अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. यामध्ये खरेदी प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव, नियमबाह्य पद्धतीने झालेली खरेदी, संशयास्पद नोंदी, जिओ-टॅगिंग प्रक्रियेतील त्रुटी तसेच शेतकऱ्यांच्या नावावर झालेल्या संभाव्य गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.खरेदी केंद्रांची संपूर्ण माहिती मागवलीपठाण सलमानखान यांनी प्रशासनाकडे जाफ्राबाद तालुक्यात सुरू असलेल्या सर्व नाफेड ज्वारी खरेदी केंद्रांची सविस्तर माहिती मागितली आहे. यामध्ये खरेदी केंद्र सुरू करण्याचा आदेश, केंद्रांची नावे, सुरू झाल्याची तारीख, शासन आदेशाच्या प्रमाणित प्रती, आजपर्यंत नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या, प्रत्यक्ष खरेदी झालेल्या ज्वारीचे प्रमाण, टोकन मिळालेले शेतकरी, प्रतीक्षेत असलेले शेतकरी यांचा तपशील देण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच ई-पिक पाहणी, सातबारा उतारे, खरेदीशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याची मागणीनाफेड ज्वारी खरेदी केंद्र सुरू झाल्यापासून दि. ५ ऑगस्ट २०२६ पर्यंतचे सर्व सीसीटीव्ही फुटेज तात्काळ सुरक्षित ठेवण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.खरेदी केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत होती का? किती कॅमेरे बसविण्यात आले होते? रेकॉर्डिंग किती दिवस जतन केले जाते? फुटेज उपलब्ध नसल्यास त्यासाठी जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली? याबाबत प्रशासनाने स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.दोषींवर फौजदारी कारवाईची मागणीया संपूर्ण प्रकरणाची जिल्हास्तरीय किंवा राज्यस्तरीय उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करण्यात यावी. चौकशीमध्ये शासनाची फसवणूक, बनावट कागदपत्रे, नियमबाह्य खरेदी किंवा अन्य कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, संस्था, कंपनी व जबाबदार व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता तसेच लागू असलेल्या कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका पठाण सलमानखान अजीजखान यांनी घेतली आहे.अनेक वरिष्ठ कार्यालयांना पाठवली नोटीसही तक्रार व कायदेशीर नोटीस जिल्हाधिकारी जालना, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, पणन संचालनालय पुणे, जिल्हा पणन अधिकारी जालना, पोलीस अधीक्षक जालना तसेच तहसीलदार जाफ्राबाद यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्याची माहिती आहे.दरम्यान, नाफेड ज्वारी खरेदी केंद्रावरील आरोपांबाबत प्रशासन कोणती भूमिका घेते, चौकशी समिती स्थापन होते का आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणती कार्यवाही केली जाते, याकडे आता जाफ्राबाद तालुक्यासह संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# २५ ते ३० वर्षांपासून प्रलंबित शेतरस्त्यांचा प्रश्न अखेर मार्गी

## 'पोलीस आपल्या बांधावर' उपक्रमातून लिंबाळा दाऊ येथील दोन शेतरस्ते खुले

लातूर। प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाला यश; किल्लारी पोलिसांच्या पुढाकाराने प्रशासनाच्या समन्वयातून शेतकऱ्यांना मोठा दिलासा. औसा तालुक्यातील लिंबाळा दाऊ येथील शेतकऱ्यांसाठी गेल्या तब्बल २५ ते ३० वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतरस्त्यांचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शन व संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'पोलीस आपल्या बांधावर' या उपक्रमांतर्गत पोलीस, महसूल व भूमी अभिलेख विभाग यांच्या समन्वयातून बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी गावातील दोन महत्त्वाचे शेतरस्ते खुले करण्यात आले. त्यामुळे अनेक वर्षांपासून या प्रश्नामुळे अडचणीत असलेल्या शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. लिंबाळा दाऊ येथील जुने हरेगाव ते जुने गाव लिंबाळा दाऊ तसेच जुने गाव लिंबाळा दाऊ ते बानेगाव हे दोन शेतरस्ते गेल्या २५ ते ३० वर्षांपासून प्रलंबित होते. या रस्त्यांअभावी शेतकऱ्यांना आपल्या शेतात ये-जा करण्यास तसेच शेतीमालाची वाहतूक, मशागतीची कामे आणि पावसाळ्यात शेतापर्यंत पोहोचण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

शेतकऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नाची दखल घेत औसा तहसीलचे अप्पर तहसीलदार स्वामी यांच्या आदेशानुसार महसूल प्रशासनाने कार्यवाही केली. यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणांमध्ये आवश्यक समन्वय साधण्यात आला. पोलीस प्रशासनाच्या पुढाकारामुळे तसेच महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या सहकार्यामुळे दोन्ही शेतरस्त्यांचा प्रश्न प्रत्यक्षात मार्गी लागला.अया संपूर्ण कार्यवाहीत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शन व संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'पोलीस आपल्या बांधावर' या उपक्रमाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेणे, संबंधित विभागांशी समन्वय साधणे आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती मदत करणे, या भूमिकेतून किल्लारी पोलिसांनी पुढाकार घेतला.पोलीस ठाणे किल्लारीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव व त्यांच्या पथकाने या कार्यवाहीसाठी विशेष परिश्रम घेत प्रशासन, महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग तसेच ग्रामस्थ यांच्यामध्ये प्रभावी समन्वय साधला. त्यांच्या प्रयत्नांमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या शेतरस्त्यांच्या प्रश्नावर सकारात्मक तोडगा निघण्यास मदत झाली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लागल्याने आता शेतीपर्यंत ये-जा करणे आणि शेतीमालाची वाहतूक करणे अधिक सुलभ होणार आहे, अशी समाधानाची भावना शेतकरी व ग्रामस्थांनी व्यक्त केली.'पोलीस आपल्या बांधावर' या उपक्रमाचा उद्देश केवळ कायदा व सुव्यवस्था राखणे एवढाच मर्यादित नसून, ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी जाणून घेऊन संबंधित प्रशासकीय यंत्रणांच्या समन्वयातून त्या सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका बजावणे, हा आहे. लिंबाळा दाऊ येथील शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणे हे या उपक्रमाच्या सामाजिक बांधिलकीचे आणखी एक उदाहरण ठरले आहे.पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'पोलीस आपल्या बांधावर' उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन संबंधित विभागांच्या समन्वयातून त्या सोडविण्यासाठी लातूर पोलीस प्रशासनाकडून पुढेही प्रयत्न करण्यात येणार आहेत.

# जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट?

## जिल्हा शल्यचिकित्सक सेवानिवृत्त होऊन रुजू कसे

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये बोगस डॉक्टरचा सुळसुळाट जिल्हा शल्यचिकित्सक पद रिक्त असल्यामुळे कारवाई कोण करणार तसेच जिल्हा शल्यचिकित्सक राजेंद्र पाटील ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले असून त्या जागेवर अद्याप पर्यंत नवीन जिल्हा शल्यचिकित्सक महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाने दिलेला नाही. सदरील जागा रिक्त का ठेवण्यात आली व तसेच सेवानिवृत्त झाल्यानंतर चार्ज कशा देण्यात आला याची उलट सुलट चर्चा सुरू आहे. या रिक्त पदामुळे कारवाई कोण करणार असे बोलले जात उपसंचालक आरोग्य सेवा विभाग संभाजीनगर या विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे. या सेवानिवृत्त प्रकरणी मॅट कोर्टाने काय निकाल दिला हे जनतेसमोर का येत नाही .

या महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाच्या याप्रकरणी दुर्लक्ष का करण्यात येत आहे. शहरात व ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न समोर आला असून, वैद्यकीय पदवी व अधिकृत परवाना नसलेल्या व्यक्तींकडून उपचार केले जात असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून होत आहेत. उपचाराच्या नावाखाली रुग्णांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचेही सांगितले जात असून, या प्रकारामुळे आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. वाड्या-वस्त्यांमधून नागरिकांची मोठी वर्दळ असते. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेत काही व्यक्तींकडून कथितरीत्या अनधिकृत उपचार केले जात असल्याचा आरोप आहे. साध्या आजारांसाठीही महागडी औषधे, सलाईन तसेच विविध उपचारांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.वैद्यकीय पात्रता नसलेल्या व्यक्तीकडून चुकीचे औषधोपचार झाल्यास रुग्णाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः प्रतिजैविक औषधे, सलाईन किंवा इतर औषधांचा अनधिकृत वापर हा गंभीर विषय आहे. त्यामुळे अशा प्रकारांची केवळ आर्थिक लूट म्हणून नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा प्रश्न म्हणून चौकशी होणे आवश्यक आहे. परिसरात अशा प्रकारच्या तक्रारी असतील तर आरोग्य विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित व्यक्तींची शैक्षणिक पात्रता, वैद्यकीय नोंदणी आणि उपचार करण्याचा अधिकार तपासणे गरजेचे आहे. अनधिकृत उपचार आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. कथित अनधिकृत दवाखान्यांची तपासणी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, तसेच रुग्णांची आर्थिक व आरोग्यविषयक फसवणूक होत असल्यास त्याला आळा घालावा,

# कर्जत -जामखेडमधील शेतकऱ्यांच्यावतीने आ. रोहित पवार यांचा भव्य नागरी सत्कार

## सरसकट कर्जमाफीच्या लढ्याला यश; मतदारसंघातील ६० हजार शेतकऱ्यांना लाभ

जामखेड। प्रतिनिधी

विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीसाठी आमदार रोहित पवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण संघर्षाला यश मिळाल्यानंतर कर्जत -जामखेडमध्ये शेतकरी बांधवांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. बैलगाडीतून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने कर्जत आणि जामखेड शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने शेतकरी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते. सरकारने नुकताच सरसकट कर्जमाफीचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे कर्जत-जामखेड मतदारसंघातील सुमारे ६० हजार शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याच पार्श्वभूमीवर कर्जत आणि जामखेडमधील शेतकरी बांधव आणि



नागरिकांनी एकत्र येत आ. रोहित पवार यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

२०१९ मध्ये 'महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजने'चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या कर्जमाफी योजनेतून वगळण्याची अट तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळण्यासाठी २०२६-२७ या वर्षातील कर्ज नियमित भरण्याची अट अशा दोन जाचक अटी सरकारने घातल्या होत्या. या अटींमुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता होती. या जाचक अटी हटवून विनाअट सरसकट कर्जमाफी देण्याच्या मागणीसाठी आ. रोहित पवार यांनी पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे रास्ता रोको आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले होते. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केलेल्या या आक्रमक आणि सातत्यपूर्ण संघर्षानंतर सरकारने या जाचक अटी हटवून सरसकट कर्जमाफीचा निर्णय घेतला. या निर्णयाचा राज्यातील सुमारे ३६ लाख शेतकऱ्यांना, तर कर्जत-जामखेड मतदारसंघातील सुमारे ६० हजार शेतकऱ्यांना लाभ झाला आहे.

दरम्यान, राज्याला सध्या अधिकृत विरोधी पक्षनेता नसला तरी विरोधी पक्षनेत्याची भूमिका बजवावी अशा पद्धतीने आ. रोहित पवार सातत्याने शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवत आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांपासून ते विनाअट सरसकट कर्जमाफीच्या लढ्यापर्यंत त्यांनी केलेला संघर्ष याचे ठळक उदाहरण असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या भव्य नागरी सत्कारामुळे कर्जत आणि जामखेडमध्ये उत्साहाचे वातावरण होते. बैलगाडीतून निघालेल्या मिरवणुकीत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्स्फूर्त घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

मिरवणुकीनंतर झालेल्या नागरी सत्कार सोहळ्यात शेतकरी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी तालुक्यातील महाविकास आघाडीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्यम आधार प्रमाणपत्र प्राप्त व्यापाऱ्यांसाठी कार्यशाळा; १८ ऑगष्टपर्यंत नाव नोंदणी करा- हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

व्यापारी महासंघ व जनरल मर्चंटस्? असोसिएशन जिल्हा जालनाच्या बैठकीचे प्रास्ताविक करताना जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब म्हणाले येत्या २३ अगस्त रविवार रोजी जिल्ह्यातील लहान-सहान, तरुण उद्योजक व्यवसाय करणारे ज्यानी आता पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या उद्यम आधार प्रमाण पत्र काढून घेतले आहे, असे उद्यम आधार असलेले व्यापाऱ्यांसाठी एक दिवसीय चडचए कार्यशाळा सकाळी १०:०० वाजे पासून जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती श्री बंब यांनी दिली.

या महत्वपूर्ण कार्यशाळेत उद्योग मंत्रालय, मुंबई येथून व्यवसाय सल्लागार सौ. पोर्णिमा सिरसकर, शासकीय ई-निविदा सल्लागार विवेक शिंदे, जालना जिल्हा उद्योग केंद्राचे मुख्य व्यवस्थापक योगेश सारणीकर हे सखोळ मार्गदर्शन करतील. मागील महिन्यात उद्योग व्यवसायत कार्यरत महिलांची कार्यशाळा घेण्यात आली होती त्या वेळेला सुध्दा शहरातील विशेष करून ग्रामीण भागातील महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. त्या अनुषंगाने युवकांसाठी हे कार्यशाळा घेण्यात येत आहे. सदर कार्यशाळेत योजना, अनुदान, नाममात्र व्याजाने कर्ज, शासकीय मदत बदल माहिती देण्यात येईल. व वर विक्री कशी सुरु करावी, आर्थिक साक्षरता, व्यवसाय नियोजन, प्रदर्शन आणि आयात-निर्यात कार्यक्रमात सहभागी होण्याची सुर्वण संधी, शासनाची कोणती ही योजना, अनुदान, बँके कडून नाममात्र व्याजा ने कर्ज घेण्यासाठी प्रास्ताव दाखल करण्यासाठी आपल्याकडे उद्यम आधार प्रमाणपत्र होण आवश्यक आहे. आपल्याकडे उद्यम असले तर आपले उत्पादन वस्तु शासनाच्या कोणत्याही कार्यालयात,महाराष्ट्रात आपले माल विक्री करण्याची संधी मिळते. गरजुं लहान पासुन मोठे उद्योजक घडविणे हे शासनाचे उद्देश आहे. जो स्वावलंबी असतील तोच महाराष्ट्राच्या, देशाच्या विकासात योगदान देऊ शकतील. आता पर्यंत जिल्ह्यात विशेष करुण ग्रामीण भागात गरजुं लहान-सहान महिलांचे अनेक प्रास्ताव मंजूर करून त्यांना योजना, अनुदान, कर्ज प्राप्त झाले आहे, यात व्यापारी महासंघाला यश मिळालेला आहे. या कार्यशाळेत शासकीय मान्यता प्राप्त प्रमाणपत्र देण्यात येईल या साठी जिल्हयातील व्यापाऱ्यांनी १८ अगस्त पर्यंत आमच्याकडे नोंदणी करुन ह्या नि:शुल्क कार्यशाळेच्या सुर्वण संधीचा लाभ घ्यावा असे आहवान जालना जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी केले आहे. अंकुश राऊत, अतुल लड्ढा, महिला आघाडीची सौ. आनंदी अय्यर, सौ. प्रिया जोशी यांनी आपले विचार मांडले. २३ अगस्त रोजी आयोजित कार्यशाळे साठी प्रमोद जोशी, सुदर्शन चिप्पा, पुरुषोत्तम सोसे, अब्बास खाँ, संतोष मोरे, पवन अग्रवाल, संजय राठी, सचिन गिल्डा, सुभाष सोनुने इ. परिश्रम घेत आहे.

**पविध पोर्टल भरती २०२६-२०२७**
**शिवशारदा शिक्षण प्रसारक मंडळ धानोरा ता. आष्टी जि. बीड**
**शिक्षक पद भरती जाहिरात**

शिवशारदा शिक्षण प्रसारक मंडळ धानोरा ता. आष्टी जि. बीड (संस्था कोडः २४२४०२SC०१८) या शैक्षणिक व्यवस्थापनाकडील / माध्यमिक शाळातील एकूण १ शिक्षण सेवक या रिक्त पदासाठी मुलाखतीसह या निवड प्रकारातून निवड करुन नेमणूक करण्यासाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत पात्र उमेदवारांकडून दिनांक १६.०८.२०२६ पर्यंत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहे. व्यवस्थापनाची सविस्तर जाहिरात व सविस्तर सुचना पहण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या https: /tait 2025 mahateacherrecruitment, org.in, या पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळास भेट दयावी विहित केलेल्या पात्रताविषयक अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांनी व्यवस्थापनाचे प्राधान्यक्रम दिलेल्या विहित मुदतीत नोंद (Lock) करावेत.

| अ. क्र. | पदनाम | अनुदान प्रकार | शैक्षणिक अहर्ता | विषय | पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक इ.९ वी ते १० वी | अनुदानित | बी.ए.बी.एड् | समाजशास्त्र | १ |

वरील जागा ही अनु. जमाती यानुसार समांतर व सामाजिक आरक्षणा नुसार पात्र उमेदवारांनी https: /tait 2025 mahateacherrecruitment, org.in, या संकेत स्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंद करावी.उमेदवारांना प्राधान्यक्रम जनरेट करण्याची सुविधा दि.६.०८.२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे तसेच प्राधान्यक्रम लॉक करण्यासाठी दिनांक ०६-०८-२०२६ ते १६.०८-२०२६ कालावधी देण्यात येत आहे.

संस्था कार्यालयाचा पत्ता
श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ,
गणेश नगर, मुर्शदपूर, आष्टी,
जि. बीड. फोन : नं.९५१८४७४७४७

सचिव / अध्यक्ष
शिवशारदा शिक्षण
प्रसारक मंडळ धानोरा
ता. आष्टी जि. बीड

**पवित्र पोर्टल शिक्षक भरती २०२६-२७**
**श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ ता. आष्टी जि. बीड**
**शिक्षक पद भरती जाहिरात**
**श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ ता. आष्टी**

जि. बीड (संस्था कोड २७२७०२SC०२५) या शैक्षणिक व्यवस्थापनाकडील माध्यमीक शाळेतील एकूण - ०१ शिक्षण सेवक या रिक्त पदांसाठी मुलाखतीसह या निवड प्रकारातून निवड करून नेमणूक करण्यासाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत पात्र उमेदवारांकडून दिनांक १६/०८/२०२६ पर्यंत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहेत.

व्यवस्थापनाची सविस्तर जाहीरात व सूचना पाहण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या https:ll tait 2025 Mahateacherrecruitment. org. in या पवित्र पोर्टलच्या संकेत स्थळास भेट दयावी. विहित केलेल्या पात्रता विषयक अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी व्यवस्थापनाचे प्राधान्यक्रम दिलेल्या विहित मुदतीत नोंद (Lock) करावेत.

| अ. क्र. | पदनाम | अनुदान प्रकार | शैक्षणिक अहर्ता | विषय | पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक इ.९ वी ते १० वी | अनुदानित | बी.ए.बी.एड् | इंग्रजी | १ |

वरील जागा ही. एस.ई.बी.सी. या आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी वरील संकेत स्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंद करावी. प्राधान्य क्रम लॉक करण्यासाठी १६/०८/२०२६ पर्यंत कालावधी दीला आहे.

संस्था कार्यालय पत्ता
श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ,
गणेश नगर, मुर्शदपूर, आष्टी,
जि. बीड. फोन : नं.९५१८४७४७४७

अध्यक्ष
श्रीराम सेवाभावी संस्था
कोयाळ ता आष्टी

# ईश्वरी ज्ञानाची जाणीव करून देणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी होय-प्रा. केशवराव शिंदे

उदगीर । प्रतिनिधी

सध्यकालीन दुःखातून समाजासाठी उपलब्ध तत्त्वज्ञानाचा समृद्ध, संपूर्ण सौख्याचा लाभ करून देण्यासाठी व पृथ्वीच्या पाठीवरील अभूतपूर्व दर्शनशास्त्रच्या ईश्वरी ज्ञानाची जाणीव करून देणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी हा होय असे मत ह. भ. प. प्रा. केशवराव शिंदे यांनी व्यक्त केले.




चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या पंधरा वर्षापासून सातत्यपूर्ण चालू असलेल्या वाचक संवादचे ३६६ वे पुष्प ह . भ.प. तुकाराम धुमाळे यांच्या अध्यक्षतेखाली ह. भ. प. प्रा. केशवराव शिंदे यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान संस्थान कमिटी आळंदी देवाची यांनी प्रकाशित केलेल्या ज्ञानेश्वरी पारायण प्रत या ग्रंथावर संवाद साधून गुंफले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, धर्मग्रंथाच्या माध्यमातून ईश्वरीय ज्ञान साऱ्या जगाला देण्याचा प्रयत्न ज्या गीतेच्या माध्यमातून करण्यात आला त्या गीतेवर सटीप असे विश्लेषण करून संत ज्ञानेश्वरांनी ते ज्ञान सर्वसामान्यांना कळावे यासाठी ज्ञानेश्वरी या ग्रंथाची निर्मिती केली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान कमिटी आळंदी देवाची यांनी या ज्ञानेश्वरीची पारायण प्रत प्रकाशित केली. या पारायण प्रतिच्या माध्यमातून सर्वसामान्यांना ईश्वरी ज्ञानाची प्राप्ती होणार यात काही शंका नाही.अध्यक्षीय समारोप करताना ह . भ.प. तुकाराम धुमाळे म्हणाले की नैतिक अनैतिकतेच्या दलदलीत सर्जनशीलतेची पेरणी ज्ञानेश्वरी या ग्रंथामध्ये मांडलेली आहे. अत्यंत प्रभावी ठरलेल्या या वाचक संवादाचे सूत्र संचालन कांता कलबुर्गे यांनी केले. संवादकांचा परिचय प्रा. सुरेश शिंदे बेंबरेकर यांनी करून दिला तर आभार प्रा. डॉ. नरेंद्र शिंदे यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. राजपाल पाटील , हनुमंत मेत्रे , आनंद बिरादार, तुकाराम बिरादार, वीरभद्र स्वामी , गोविंद सावरगावे , सुरेश वजनाम, तुळशीदास बिरादार आदींनी परिश्रम घेतले.

# ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीचे वसतीगृह म्हणजे उज्वल भविष्याची पायाभरणी-उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या मुलांनी गरिबी आणि स्थलांतराचे दुष्टचक्र तोडून डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, पोलीस अधिकारी आणि उद्योजक व्हावे, हेच आमचे स्वप्न आहे. याच उद्देशाने उभारण्यात आलेले संत भगवानबाबा वसतीगृह त्यांच्या उज्वल भविष्याची पायाभरणी ठरेल, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

लोकनेते गोपिनाथ मुंडे उसतोड कामगार कल्याण महामंडळ पुणे अंतर्गत संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह, बीड येथील इमारतीच्या उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. स्वत:च्या जागेवर बांधण्यात आलेले बीड जिल्ह्यातील हे पहिलेच वसतिगृह आहे. यावेळी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, व्यवस्थापकीय संचालिका लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे दीपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची प्रमुख उपस्थिती होती.






पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, दरवर्षी ऊसतोडणी हंगामात कामगारांना मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करावे लागते. या कष्टाच्या प्रवासात मुलांच्या शिक्षणात पडणारा खंड हा त्यांच्या भविष्यातील सर्वात मोठा अडथळा ठरत होता. रात्रंदिवस मेहनत करणारा हा वर्ग केवळ राज्याच्या अर्थकारणाला गती देत नाही, तर आपल्या घामातून समृद्धीची निर्मिती करतो. त्यामुळे या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांना हक्काचे स्थान मिळावे, यासाठी हे वसतीगृह अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरेल, तसेच या वसतीगृहामुळे ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात राहणे सोपे होणार असून, त्यांच्या प्रगतीचा एक नवा मार्ग तयार झाला आहे.

आपले राज्य हे कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे आणि श्रमिकांचे राज्य आहे. राज्याच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या साखर उद्योगाचे चक्र फिरवणारा ऊसतोड कामगार हा अत्यंत स्वाभिमानी आणि अभिमानी आहे. ज्या आई-वडिलांच्या हातात आयुष्यभर कोयता राहिला, त्यांच्या मुलांच्या हातात आता वही, पुस्तक, संगणक आणि स्वप्ने असली पाहिजेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी होस्टेल उभारणीची मोठी मोहीम आपल्या विभागाने हाती घेतली आहे. गेल्या २ वर्षाच्या कालावधीत २७०० कोटी रुपयांचा निधी विभागाने दिल्याचे सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी सांगितले. यातून ८२ वसतिगृह बांधण्याचे नियोजन आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवता यावे आणि ऊसतोड कामगार म्हणून पालक काम करीत असले तरी विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे यासाठी अभ्यासिका, ग्रंथालय आदी सुविधा देखील विकसित करण्यात येत असल्याची माहिती ◀◀ पान ३ वर

# बीडमध्ये बस स्थानकात सोनसाखळी चोरणाऱ्यास अटक

बीड । प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेने एका महत्त्वपूर्ण कारवाईत बीड शहर बस स्थानकात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या एका आरोपीला जेरबंद केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडमधील शिवाजीनगर बस स्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेऊन सोनसाखळी चोरीची घटना घडली होती. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, बाबासाहेब




महादेव गायकवाड (वय ५८, रा. येळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) या संशयित आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांनी अधिक विचारपूस केली असता, आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. अंगझडती घेतली असता, त्याच्याकडून सुमारे ८० हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी जप्त करण्यात आली आहे. आरोपीवर पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# युसूफवडगांव ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार; मुख्य रस्त्याच्या मधोमध बसवले पाणीपुरवठ्याचे व्हॉल्व्ह

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला असून मुख्य रहदारीच्या रस्त्याच्या मधोमध पाणीपुरवठ्याचे व्हॉल्व्ह बसवण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या व्हॉल्व्हमुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असून ते तातडीने हटवून रस्त्याच्या कडेला किंवा कोणालाही अडचण होणार नाही अशा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



युसूफवडगावातून आनंदगाव-सारणीकडे जाणारा जुना रस्ता, जो सध्या ‘चोपण वाट’ म्हणून ओळखला जातो, हा मूळतः ६६ फूट रुंदीचा होता. मात्र, दोन्ही बाजूंनी झालेल्या अतिक्रमणामुळे या रस्त्याची रुंदी अनेक ठिकाणी अवघी १० ते १५ फूट इतकीच उरली आहे.अशा परिस्थितीत काही दिवसांपूर्वी ग्रामपंचायतीने पाणीपुरवठ्याचे व्हॉल्व्ह थेट रस्त्याच्या मधोमध बसवले. त्यामुळे या मार्गाचा वापर करणाऱ्या शेतकरी व नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ऊस वाहतूक हंगामात ट्रॅक्टर, ट्रॉली व इतर मोठ्या वाहनांच्या वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी हे व्हॉल्व्ह रस्त्याच्या कडेला होते. लोखंडी सावरगाव-माळेगाव राज्य मार्गाच्या रुंदीकरणाच्या कामादरम्यान ते रस्त्यात येत असल्याने काढण्यात आले होते. मात्र, रस्ता रुंदीकरण पूर्ण झाल्यानंतर ते पूर्वीप्रमाणे कडेला बसवण्याऐवजी ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी ते रस्त्याच्या मधोमध बसवले. ग्रामपंचायतीचे काम नागरिकांच्या सोयीसाठी ◀◀ पान ३ वर

# युसूफवडगाव येथे पीएम आवास योजनेअंतर्गत ५९७ घरकुलांना मंजुरी

युसूफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे ग्रामपंचायतीच्या विशेष प्रयत्नांतून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तब्बल ५९७ घरकुलांना मंजुरी मिळाली असून, गावातील वंचित, अल्पभूधारक व गरजू नागरिकांसाठी हा महत्त्वाचा दिलासा मानला जात आहे.

सरपंच सौ. सुलक्षणाताई गायके यांनी पदभार स्वीकारल्यानंतर गावातील गरजू कुटुंबांना विविध शासकीय योजनांमधून घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्याच प्रयत्नांचा भाग म्हणून पीएम आवास योजनेअंतर्गत ५९७ घरकुलांना मंजुरी मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

गावातील एकही पात्र वंचित कुटुंब घरकुलापासून वंचित राहू नये, यासाठी ग्रामपंचायतीने विशेष लक्ष दिले आहे. मंजूर झालेली घरकुले क्रमवारीनुसार टप्प्याटप्प्याने लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणार असून, त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही लाभार्थ्यांच्या यादीत दुबार नावे तसेच पती-पत्नी दोघांचीही नावे समाविष्ट झाल्याची बाब निदर्शनास आली आहे. अशा प्रकरणांची सखोल पडताळणी करून पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने लाभार्थ्यांनी संयम बाळगावा आणि अनावश्यक घाई करू नये, ◀◀ पान ३ वर

# डॉ. साक्षी सानप यांची अंमळनेर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारीपदी नियुक्ती

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील रिक्त पदावर डॉ. साक्षी पांडुरंग सानप यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून निवड झाली असून, पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



डॉ. साक्षी सानप यांच्या शिक्षण हे ग्रामीण भागात झाल्या असल्याने त्यांना ग्रामीण भागातील परिस्थितीची जाणीव आहे त्यामुळे यांच्या या नियुक्तीमुळे अंमळनेर व परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे.आपल्या या यशाबद्दल बोलताना डॉ. साक्षी सानप यांनी मनापासून आनंद व्यक्त केला असून, या यशाचे श्रेय त्यांनी आपले आजोबा ज्ञानदेव गंगाराम सानप, आजी स्व. अनारकला ज्ञानदेव सानप तसेच वेळोवेळी योग्य दिशा देणाऱ्या सर्व मार्गदर्शक शिक्षकांना दिले आहे. डॉ. साक्षी यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# घाटनांदुर येथे खाजगी सावकाराच्या जाचाला कंटाळून मुख्याध्यापकाने विष प्रशन केल्याची घटना

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथून जवळ असलेले अंबलटेक येथील खाजगी सावकार मारुती (बाळू)माणिक नागरगोजे यांच्याकडून श्री प्राथमिक आश्रम शाळा लेंडेवाडी येथे कार्यरत असलेले मुख्याध्यापक सुभाष देवराव राठोड (रा.लेंडेवाडी तांडा ह. मु घाटनांदुर ) यांनी पैसे घेतले होते व ते पैसे मुलाच्या फोनपेद्वारे खाजगी सावकार मारुती (बाळू) नागरगोजे यांना परत केले असून खाजगी सावकार वारंवार फोन द्वारे मेसेज करून शाळेवर येऊन जीवे मारण्याच्या धमक्या देत असल्यामुळे व शाळेवर येऊन गाडीवर बसवून नेल्याने चिट्टी लिहून मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी ११ ऑगस्ट मंगळवार रोजी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला असता




त्यांना तातडीने उपचारासाठी अंबाजोगाई येथे रुग्णालयात दाखल करण्यात आल्यामुळे कोणतीही जीवित हानी झाली नाही त्यांच्यावर उपचार सुरू आहेत दरम्यान खाजगी सावकार मारुती (बाळू) ◀◀ पान ३ वर

# उद्योजक अशोक चौधरी यांच्याकडून मच्छिंद्रनाथ देवस्थानाला २ लाख ५१ हजारांची चांदीची देणगी



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थानाच्या विकासासाठी आष्टी तालुका मराठा सेवा संघाचे उधोजक तालुकाध्यक्ष तथा युवा उद्योजक अशोक शेठ चौधरी यांच्याकडून १ हजार ग्राम (१ किलो) चांदीची देणगी दिली आहे. सुमारे २ लाख ५१ हजार रुपये किमतीची ही देणगी आष्टी मतदारसंघाचे आमदार तथा लोकनेते सुरेश धस यांच्याकडे मित्र परिवारा समवेत सुपूर्द करण्यात आली.

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान हे आष्टी तालुक्यासह परिसरातील

## १ किलो चांदीची देणगी आ. धस यांच्याकडे सुपूर्द

भाविकांचे श्रद्धास्थान असून, देवस्थानाच्या विकासासाठी विविध स्तरातून सहकार्य मिळत आहे. लोकाभिमुख नेतृत्व असलेले आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शेत्र मायंबा मच्छिंद्रनाथ देवस्थानचे भव्य दिव्य असे मंदिर उभारणीचे काम सुरू असून याच सामाजिक व धार्मिक बांधिलकीतून उद्योजक अशोक शेठ चौधरी यांनी पुढाकार घेत देवस्थानासाठी चांदीच्या स्वरूपात मोलाचे योगदान दिले. दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी १ हजार ग्राम चांदीची वस्तूरूपी देणगी देवस्थानाच्या नावे स्वीकारण्यात आली. या चांदीची किंमत सुमारे २ लाख ५१ हजार रुपये असल्याची नोंद पावतीवर करण्यात आली आहे. देवस्थानाच्या विकासासाठी रोख रकमेबरोबरच वस्तूरूपी देणगी देण्याची परंपराही भाविकांकडून जपली जात आहे. उधोजक अशोक शेठ चौधरी यांनी देणगीतून देवस्थानाच्या विविध धार्मिक व विकासकामांना हातभार लागणार आहे. आष्टी मतदारसंघातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी लोकसहभागातून योगदान मिळावे, यासाठी ◀◀ पान ३ वर

# महंत जनार्दन महाराजांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

## वै. विश्वंभर महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्याला हजारो भाविकांची उपस्थिती

फुलसांगवी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र माऊली संस्थान नारायणवाडी मठाधिपती वै. विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या पाचव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त संस्थान वरती गेल्या आठ दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह पार पडत होता. त्याची सांगता आज श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. वै. विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या पुण्यतिथी सोहळ्याला पंचक्रोशीतून या या निमित्ताने हजारो भाविकांनी उपस्थिती लावली होती.

शिरूर कासार तालुक्यातील





श्री.क्षेत्र माऊली संस्थान नारायणवाडी येथे वै. स्वामी निगमानंद महाराज यांची मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिन व संस्थान मठाधिपती वै. विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या पाचव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या आठ दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह पार पडत होता. सप्ताह दरम्यान चालू असलेल्या काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, श्रीमद्भागवत गीता, ◀◀ पान ३ वर

# रोजगार हमी योजनेतून शाळा-अंगणवाडीचा ‘बॅकलॉग’ भरून काढणार; आ.धस यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

## आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील ग्रामसेवक, सरपंच व रोजगार सेवकांची संयुक्त बैठक; जीर्ण वर्गखोल्यांच्या प्रश्नावर तातडीने कामे हाती घेण्याचे निर्देश

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या तसेच अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामाचा मोठा अनुशेष भरून काढण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या रोजगार हमी योजना विभागाअंतर्गत नव्याने सुरू झालेल्या ‘विकसित भारत-जी व्हीबी ग्राम जी’ (तइ-ऋठ-च् ऋ) योजनेच्या माध्यमातून शाळा व अंगणवाडीच्या पायाभूत सुविधांची कामे मोठ्या प्रमाणावर मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यासंदर्भात आ. धस यांनी आष्टी-पाटोदा-शिरूर तालुक्यातील अधिकारी, सर्व सरपंच, ग्रामसेवक व रोजगार सेवकांची संयुक्त बैठक घेतली. मतदारसंघातील अनेक गावांमधून नवीन शाळा



खोल्या, अंगणवाडी खोल्या तसेच शाळांच्या दुरुस्तीची मागणी सातत्याने होत आहे. मात्र, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणारा निधी मर्यादित असल्याने सर्व मागण्या एकाचवेळी पूर्ण करणे शक्य होत नाही. त्यामुळे उपलब्ध पर्यायी निधीचा प्रभावी वापर करून हा अनुशेष भरून काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

व्हीबी ग्राम जी योजनेतून विविध कामांना चालना

या योजनेंतर्गत कुशल कामांच्या माध्यमातून अंगणवाडी खोली बांधकाम, किचन शेड/किचन सेट बांधकाम, शाळा खोली बांधकाम, शाळा खोली दुरुस्ती, मुलांचे व मुलींचे शौचालय बांधकाम, शाळा संरक्षण भिंत यासह विविध सार्वजनिक स्वरूपाची कामे करता येणार



आहेत. त्यामुळे मतदारसंघातील ज्या गावांमध्ये शाळा किंवा अंगणवाडीच्या इमारतींची आवश्यकता आहे, तेथे स्थानिक पातळीवर प्रस्ताव तयार करून ही कामे गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

२०-२५ वर्षांपासून नवीन वर्गखोल्यांची प्रतीक्षा

मतदारसंघातील अनेक जिल्हा परिषद शाळांच्या इमारती जुन्या झाल्या असून काही वर्गखोल्या जीर्ण अवस्थेत आहेत. पावसाळ्यात काही वर्गखोल्यांमधून पाणी गळते, तर काही खोल्या विद्यार्थ्यांना बसण्यास योग्य राहिलेल्या नाहीत. गेल्या २० ते २५ वर्षांच्या कालावधीत नवीन वर्गखोल्यांची बांधकामे अपेक्षित प्रमाणात झालेली नसल्याने हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन शाळा व अंगणवाडीच्या बांधकामाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आ. सुरेश धस यांनी ग्रामपंचायत पातळीवरील यंत्रणेला सक्रिय होण्याचे आवाहन केले. गटविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक आणि रोजगार सेवक यांनी समन्वयाने काम करून जास्तीत जास्त प्रस्ताव मंजूर करून प्रत्यक्ष बांधकामे सुरू करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. बैठकीस गटविकास अधिकारी भारत नागरे, प्रयाग धमाल, माने यांच्यासह विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, प्रमुख पदाधिकारी, ग्रामसेवक व रोजगार सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26